# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २०४ वा ❑ भारतीय सौर दिनांक ११ आश्विन शके १९४८, शनिवार दि.०३ ऑक्टोंबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# कर्माचे डोळे ज्ञान ते निर्दोष होआवे स्वामी रामानंद तीर्थ

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

भारत देशाच्या कल्याणासाठी जन्मलेले तेजस्वी रत्न म्हणजे स्वामी रामानंद तीर्थ. यशोदा व भवानराव यांच्या पोटी ३ ऑक्टोबर १९०३ रोजी कर्नाटकातील सिंदगी येथे व्यंकटेशचा जन्म झाला. आई-वडिलांच्या अध्यात्मिक साधनेचा ठसा बालपणीच व्यंकटेशच्या कोवळ्या मनावर उमटला. त्यांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा सिंदगी या त्यांच्या जन्म गावीच झाला, पुढे गाणगापूर येथे त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले.

**राष्ट्रभक्तीचे संस्कार**

सोलापूर येथील प्रख्यात नॉर्थ कोट हायस्कूलमध्ये व्यंकटेश यांनी प्रवेश घेतला. या शाळेत त्यांच्यावर राष्ट्रभक्तीचे संस्कार झाले आणि राष्ट्रप्रेमाची बीजे मनात निर्माण झाली. मुंबईत मेकॉनली थिएटरमध्ये तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड वेलिंग्टन यांच्या भाषणामुळे ब्रिटिश साम्राज्याविषयीची चीड स्वामीजींच्या मनात निर्माण झाली. त्यांनी वस्तीगृहावर लावण्यात आलेला युनियन जॅक झेंडा मित्रांच्या मदतीने फेकून दिला. एकनाथ गोडबोले या मित्राची सोबत त्यांना शाळकरी वयात मिळाली. ही मैत्री निरपेक्ष जीवन जगण्यासाठी त्यांना मार्गदर्शक ठरली.

**कष्ट, अभ्यास आणि लेखन**

अंमळनेरच्या राष्ट्रीय महाविद्यालयांमध्ये पुढील शिक्षणासाठी व्यंकटेश रवाना झाले. वसतिगृहात राहण्यासाठी व दैनंदिन गरजा भागविण्यासाठी त्यांना भावाकडून दहा रुपये मिळत. ग्रंथालयामध्ये दररोज तीन तास काम करून ते महिन्याकाठी १५ रुपये मिळवत. अशा पद्धतीने स्वकष्टातून त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण सुरू केले. ते सकाळी साडेतीन वाजता उठत व रात्री उशिरापर्यंत अभ्यास करत. याच काळात त्यांनी मित्रांच्या सहकार्याने वेड्याचे प्रताप हे सदर हस्तलिखित मासिकातून प्रकाशित केले. या मासिकात प्रामुख्याने आत्मानुभव लिहिले जात. वर्गमित्रांसमवेत केलेल्या अभ्यासाबाबतच्या चर्चा शैक्षणिक वाटचालीत महत्त्वाच्या ठरल्या. या महाविद्यालयाचे प्राचार्य जनार्दनपंत गुणे आध्यात्मिक वृत्तीचे व ब्रह्मचारी गृहस्थ होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव व्यंकटेश यांच्यावर पडला.

**स्वदेशी व खादीचा पुरस्कार**

कर्तव्यनिष्ठा, शिस्तप्रियता हे गुण प्राचार्यांच्या व्यक्तिमत्वामधून व्यंकटेश यांनी आत्मसात केले. याच काळात त्यांनी स्वयंसेवक दल निर्माण केले. याठिकाणी देशभक्तीपर गीते, स्वयंशिस्त, नीतीमूल्यांची जपवणूक, चरख्यावरील सुत कताई इत्यादी बाबी नेटाने व शिस्तीने केल्या. साधारणतः हे काम एक तास चाले. खादीचा वापर करण्यावर त्यांनी या काळात भर दिला. यंग इंडिया या महात्माजींच्या नियतकालिकाचे नियमित वाचन करणे ही चांगली सवय या काळात त्यांनी लावून घेतली. स्वदेशीचा वापर करण्याचा पुरस्कार करण्यासाठी त्यांनी व त्यांच्या मित्रांनी गिरणीवर तयार होणाऱ्या कापडाच्या ढिगास आग लावली. वस्तीगृहात काही कारणामुळे मतभेद झाले व त्यांना वसतिगृह सोडावे लागले, त्यानंतर दोन मैलांवर असणाऱ्या एका पडक्या घरात राहून, दोन रुपये महिना देऊन त्यांनी डाळ भाकरीवर आपली गुजरान केली. कुठलीही तक्रार न करता त्यांनी आपला प्रवास सुरू ठेवला.

**पुण्यातील वास्तव्य**

पुढील शिक्षणासाठी त्यांनी पुण्यातील टिळक महाविद्यालय गाठले. १९२५ मध्ये ते वाङ्मय विशारद पदवीधर झाले. पुढे दोन वर्षांचे फेलो म्हणून त्यांची निवड झाली व एम. ए. समकक्ष असलेली वाङ्मय पारंगत ही पदव्युत्तर पदवी लोकशाहीचा विकास या विषयावर उत्कृष्ट निबंध लिहून त्यांनी मिळवली.

पुणे येथे वास्तव्य असताना ना.म.जोशी यांच्याशी त्यांचा परिचय झाला. ना.म.जोशी हे कामगार चळवळीचे नेतृत्व करत होते आणि त्यांना एक सहाय्यक हवा होता. यासाठी त्यांनी भांडवल व श्रम या विषयावर निबंध लिहून पाठवण्याचे आवाहन केले होते. व्यंकटेश यांनी या आवाहनास प्रतिसाद दिला व निबंध लिहिला. व्यंकटेश यांनी लिहिलेला निबंध न.म.जोशी यांना आवडला व त्यांची नोकरी निश्चित झाली.

**मुंबईतील कार्य**

अशाप्रकारे व्यंकटेश यांनी शिक्षणाचा उपयोग समाजासाठी करण्यास सुरुवात केली. टेक्स्टाईल लेबर युनियन या कामगार संघटनेत मुंबई शहराचे उपसंघटक म्हणून व्यंकटेश रुजू झाले.

मुंबईतील वास्तव्यात व्यंकटेश यांनी कामगारांचे होणारे शोषण जवळून अनुभवले व त्यांच्या मनात चीड निर्माण झाली. सुप्रसिद्ध कामगार नेते एस. एच. झाबवाला यांच्याशी याच काळात व्यंकटेश यांचा संपर्क आला. त्यांनी सुरू केलेल्या कामगार या साप्ताहिकाचे संपादनकार्य वेंकटेशजींनी आनंदाने स्वीकारले. सर्व्हंटस ऑफ इंडियन सोसायटी या संस्थेचे ते सदस्य झाले. एन. बी. सकलातवाला या कामगार नेत्यांबरोबर त्यांनी विविध कामगार सभांना उपस्थित राहण्यास सुरुवात केली.

**दिल्लीतील वार्तांकन**

ना.म.जोशी यांनी पुणे येथील ज्ञानप्रकाश या वृत्तपत्राचे प्रवेशपत्र व्यंकटेशजी यांना मिळवून दिले, त्यामुळे दिल्ली येथील केंद्रीय विधिमंडळात उपस्थित राहून वार्तांकन करण्याची संधी या दिवसात व्यंकटेश यांना लाभली. याच काळात त्यांनी विविध दिग्गज नेत्यांची भाषणे ऐकली. हे नेते कसे काम करतात? ते प्रत्यक्ष जवळून अनुभवता आले. या नेतृत्वाची काम करण्याची शैली, समजून घेता आली. लाला लाजपतराय, मोतीलालजी नेहरू या नेत्यांबद्दल त्यांनी जाणून घेतले.

**पुन्हा सोलापूर**

याच काळात स्वामीजींना अर्धांगवायूचा झटका आला, आजारातून ते सहीसलामत बाहेर पडले.पण दगदग सहन होत नव्हती. ना.म.जोशींनी त्यामुळे त्यांना मुंबईच्या कामकाजाऐवजी सोलापूरच्या कामगार चळवळीचे कामकाज पाहण्यास नियुक्त केले. सोलापुरातील वास्तव्यादरम्यान व्यंकटेशजींचा हिप्परगा येथील शाळेचे संचालक अनंतराव कुलकर्णी यांच्याशी स्नेह जडला. कुलकर्णी यांनी व्यंकटेशजींना हिप्परगा येथील राष्ट्रीय शाळेची माहिती दिली. या शाळेचे मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी घ्यावी असेही त्यांनी सुचवले. शाळा पाहून पुढील निर्णय घेईल असे व्यंकटेशजींनी अनंतराव कुलकर्णी यांना कळवले.

**शिक्षक म्हणून कार्य**

शाळा आवडल्यानंतर आपल्या जीवनाच्या नव्या अध्यायाला वेंकटेशजी यांनी प्रारंभ केला. दिनांक ९ जून १९२९ रोजी हिप्परगा शाळेचे मुख्याध्यापक म्हणून व्यंकटेश भवानराव खेडगीकर रुजू झाले. ते विद्यार्थ्यांमध्ये रमले. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, नैतिकता, शिस्त, स्वावलंबन हे गुण रुजवण्यासाठी त्यांनी विविध प्रयोग केले. अभ्यासक्रमाच्या सोबत त्यांनी मूल्य शिक्षणाची रुजवात केली. हिप्परगा येथे असतानाच व्यंकटेशजी यांच्या मनात संन्यास दीक्षा घेण्याची इच्छा प्रबळ झाली, रामतीर्थ यांचे शिष्य असलेल्या नारायण स्वामी यांच्याकडून दिनांक १४ जानेवारी १९३२ रोजी हिप्परगा येथे त्यांनी संन्यासदिक्षा घेतली व व्यंकटेश भवानराव खेडगीकर यांना स्वामी रामानंद तीर्थ ही ओळख मिळाली.

**स्वामी रामानंद तीर्थ ही ओळख**

शाळेच्या मान्यतेसाठी स्वामी रामानंद तीर्थ यांना खूप झगडावे लागले. त्यांची तळमळ, चिकाटी, काम करण्याची हातोटी हे पाहून सर हैदरी यांनी शाळेच्या मान्यतेचे लेखी अभयपत्र दिले. मुंबई येथील भेटीमध्ये १९३७ साली सय्यद अली अकबर यांनी शाळेची तपासणी केली. विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली. जोशी यांनीदेखील शाळेला मान्यता मिळावी म्हणून स्वामीजींसोबत प्रयत्न केले, आणि या प्रयत्नांना यश लाभले. १९३८ मध्ये दहावीची पहिली बॅच हिप्परग्याच्या शाळेतून बाहेर पडली. हे यश शाळेच्या मान्यतेपुरते मर्यादित नव्हते तर निजामशाहीला टक्कर देण्यासंदर्भाने जनमानस निर्माण करण्यासाठी सुरू झालेला हा एक भरभक्कम आशावाद होता. पुढे याच शिक्षण संस्थेच्या माध्यमातून १९५६ साली संस्थेअंतर्गत योगेश्वरी विज्ञान महाविद्यालय उघडण्यात आले.

हैदराबादचे राजा धनराजगिर एक गर्भ श्रीमंत व्यक्तिमत्व होते. त्यांना डेक्कनचा कुबेर समजले जाई. त्यांची स्वामी रामानंद तीर्थ यांच्यावर श्रद्धा होती, राजा धनराज गीर यांना हिप्परगा शाळेच्या दशकपूर्ती समारोहाच्या कार्यक्रमास आमंत्रित करण्यात आले.२२ जानेवारी १९३२ रोजी राजा धनराज गिरी यांनी स्वामीजींच्या स्वीकृत तत्व व कार्याविषयी गौरवोद्गार काढले होते, धनराज गिर यांच्या कन्या राजकुमारी इंदिरादेवी यांची मी मराठवाडा अमृत महोत्सवाच्या निमित्ताने भेट घेतली त्या अत्यंत शांत मायाळू आणि वडिलांबाबत, वडिलांनी निजाम काळात हैदराबाद येथे केलेल्या कार्याबाबत तसेच महिलांच्या संदर्भाने निजाम काळात झालेल्या विविध चळवळींबाबत विविधांगी चर्चा केली.



**अंबाजोगाईतील शैक्षणिक कार्य**

हिप्परगा येथील शाळेत काही वैचारिक मतभेद झाल्यामुळे स्वामी रामानंद तीर्थ यांनी आंबेजोगाई येथे योगेश्वरी शाळेमध्ये लक्ष घातले आंबेजोगाई या ठिकाणी एखादी शाळा सुरू करावी असे त्यांच्या मनात होते आंबेजोगाई येथील नारायणराव जोशी यांनी १९१८ मध्ये योगेश्वरी नूतन विद्यालय ची स्थापना केली होती. योगेश्वरी देवीच्या मंदिराजवळील हॉलमध्ये ही जागा भरत असे मार्च १९३५ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ या ठिकाणी आले. ५ मे १९३५ रोजी अक्षय




तृतीयेच्या दिवशी या शाळेत नव्याने आठवा वर्ग सुरू करण्यात आला. स्वामीजी योगेश्वरी नूतन विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून काम करू लागले. जुलै १९३६ मध्ये त्यांनी नववीच्या वर्ग सुरू केला. राष्ट्रप्रेम, निजाम राजवटी विरोधी मानसिकता या मुळे तसेच शाळेमध्ये उर्दू भाषेत शिकवले जात नसल्यामुळे निजाम सरकार शाळेला मान्यता देत नव्हते. या शाळेच्या संदर्भाने स्वामीजी म्हणाली की आमची शाळा विद्यार्थ्यांना नवा विचार देईल पण कोणत्याही विचारांची सक्ती करणार नाही, माणसा-माणसामधील भिंती तोडून ह्रदयातला माणूस ओळखणे आमच्या शाळेतून शिकवले जाईल. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या समवेत बाबासाहेब परांजपे यांनी जनतेला हा विचार पटवून दिला.

**स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व**

निजामाविरुद्ध लढा देण्यासाठी योग्य नेतृत्व हवे आहे या जाणिवेतून संस्थानातील राजकीय चळवळीचे नेतृत्व करण्यास स्वामी रामानंद तीर्थ योग्य व समर्थ आहेत त्यामुळे स्वामीजींनी राजकीय चळवळीचे नेतृत्व करावे अशी चर्चा सुरू झाली तेव्हा स्वामीजींनी योगेश्वरी शाळेच्या कार्यकारी मंडळाशी या संदर्भाने निर्णय घेण्यासाठीचा मनोदय बोलून दाखवला. सर्वांनीच स्वामीजींना राजकीय चळवळीत सक्रिय नेतृत्व करण्यासाठी प्रोत्साहन दिले. आणि स्वामी रामानंद तीर्थ महाराष्ट्र परिषदेच्या अस्थाई समितीचे चिटणीस झाले. मुख्याध्यापक पदाचा त्यांनी राजीनामा दिला आणि संस्थेचा निरोप घेऊन ०९ जून १९३८ रोजी हैदराबादकडे जिम्मेदारांना हकूमत लेके रहेंगे या जाणिवेतून कूच केली.

**निजामकालीन शिक्षणव्यवस्था**

निजामकालीन शिक्षण हे निजाम राजवटीला पोषक ठरणारे होते. त्यात प्रामुख्याने निजाम कायदा शिकवला जात असे. शिक्षणाची भाषा उर्दू होती. निजामी पद्धतीचा पोशाख विद्यार्थ्यांनी परिधान करणे अनिवार्य होते. पायघोळ झब्बा, डोक्यावर रुमी टोपी बंधनकारक असे. शिक्षण संस्था साधारणत: तीन विभागात विभागल्या गेल्या होत्या. पहिली ते चौथी प्राथमिक शाळा( मदरसे तह तानिया) पाचवी ते सातवी पूर्व माध्यमिक शाळा (मदरसे वस्तानिया)आणि माध्यमिक शाळा इयत्ता आठवी दहावी साठी असे ज्याला मदरसा फोकनिया म्हटले जाई. पुढे उस्मानिया विद्यापीठ स्थापन केले गेले. यातूनच पुढे छत्रपती संभाजीनगर येथे पहिले औद्योगिक शिक्षणाची शाळा १८८१ व शेतकी स्कूल १८९२ सुरू झाले. छत्रपती संभाजीनगर येथील मदरसा फोकणीयामध्ये उर्दू प्रमाणेच इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळत असे. उस्मानिया इंटरमिजिएट कॉलेज या शहरात सुरु झाले होते. लेखी परीक्षा विद्यार्थ्यांना पास होण्यासाठी अनिवार्य असल्या संदर्भातील कायदा हा इसवी सन १८७३ साली झाला होता.

**राष्ट्रीय शाळांची निर्मिती**

निजाम सत्तेला विरोध करण्यासाठी व राष्ट्र प्रेमाची भावना समाजात निर्माण करण्यासाठी मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या राष्ट्रीय शाळा मोठ्या प्रमाणात निर्माण होणे आवश्यक होते.

निजाम राज्यात साधारणत: १९१६ ते १९४६ च्या दरम्यान परभणी, छत्रपती संभाजीनगर येथील सरस्वती भुवन, मराठा हायस्कूल, शारदा मंदिर, गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालय, चाकूर मधील शिक्षण संस्था,आंबेजोगाई येथील योगेश्वरी, उदगीर येथील शिक्षण संस्था, लातूर येथील ज्युबिली व राजस्थान या शैक्षणिक संस्थांनी राष्ट्रीय कार्याची मुहूर्तमोढ रोवली. परतूर येथे भरलेल्या पहिल्या महिला परिषदेच्या अध्यक्षा होण्याचा मान मिळालेल्या सुशिलाबाई दिवाण यांच्या मुलीने काढलेल्या खाजगी शाळेची खूप प्रशंसा त्या काळी झाली.

**मातृभाषेचे महत्व अधोरेखित**

निजाम सरकारला विरोध करण्यासाठी, मातृभाषेला प्राधान्य देण्यासाठी, आंध्र संघम, आर्य समाज इत्यादींनी शाळा, वाचनालय, स्वतंत्र अभ्यासक्रम सुरू करण्यास प्रारंभ केला. मराठवाड्यामध्ये या संदर्भाने प्रयत्न सुरू झाले होते. साधारणता २० -२१ शाळा त्या काळात सुरू झाल्या. विवेकवर्धिनी (हैदराबाद) तसेच गुलबर्गा येथे विठ्ठलराव देऊळगावकर यांनी विद्यालय स्थापन केले.

**राष्ट्रीय शिक्षणाची आवश्यकता**

साधारणतः १९०६ मध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रप्रेम, मातृभाषा, भारतीय संस्कृतीला महत्त्वाचे मानून राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना मांडली गेली. या धोरणाला महत्त्व देऊन मराठवाड्यात विविध ठिकाणी शाळा सुरू झाल्या. शैक्षणिक चळवळीच्या मदतीने राष्ट्र प्रेमाची जडणघडण करणे सुरू झाले. जे अखंड भारतासाठी महत्त्वाचे ठरले.

स्वामी रामानंद तीर्थ यांनी शैक्षणिक चळवळीत आपले योगदान देण्यास सुरुवात केली. १९४७-४८ मध्ये संत साहित्याच्या अभ्यासासाठी शैक्षणिक संस्था सुरू केली होती. नांदेड मधील सर्व शैक्षणिक संस्था त्या काळात राष्ट्रप्रेमाणे भारलेल्या होत्या. विकास मंदिर वाचनालय, बंजारा होस्टेल, हुतात्मा पानसरे हायस्कूल धर्माबाद, चोखामेळा वसतीगृह,महिला समता परिषदेचे प्रौढ शिक्षणाचे कार्य, विवेकवर्धिनी मराठी शाळा (हैदराबाद ) कंधार, भोकर, खामगाव, बुलढाणा येथील शैक्षणिक संस्था या राष्ट्रभक्तीने भारलेल्या होत्या.

**व्यायामशाळांची उभारणी**

शिक्षण केवळ शिक्षण संस्थेमधून मिळते असे नाही तसेच वैचारिक समृद्धते सोबत शारीरिक सुदृढता ही महत्त्वाची असते. म्हणून नांदेड व मराठवाड्यात त्या काळात व्यायाम शाळा उघडण्यात आल्या.

**संगीत – चित्रकला विद्यालय, वाचनालय निर्माण करण्यात आली.**

सोबतच व्याख्यानमालांचे आयोजन,मासिके, वर्तमानपत्रे निर्माण झाली यातील अनेक जणांनी आजपर्यंत प्रामाणिकता, कर्तव्यनिष्ठा टिकवून ठेवली आहे.

नांदेड येथील २१ जून १९४० ला स्थापन झालेली प्रतिभा निकेतन शैक्षणिक संस्था, इंद्रायणी बोधनकर यांनी सुरू केलेले बालक मंदिर, मराठवाडा महिला शिक्षण संस्था जी पुढे मराठवाडा महिला उद्योग या नावाने ओळखली जाऊ लागली यांनी जनसामान्यांसाठी कार्य केले.

**मुक्तीसंग्राम यशस्वी झाल्यानंतर**

मुक्ती संग्राम यशस्वी झाल्यानंतर मराठवाड्यामध्ये शिक्षणाच्या माध्यमातूनच खरा विकास घडवून आणता येऊ शकतो, याची जाणीव स्वामीजींना होती. म्हणून त्यांनी त्यादृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली.

२६ जून १९५० रोजी याचे फलित म्हणून नांदेड येथे पहिले पीपल्स कॉलेज उभारले गेले. या संस्थेत ज्ञान आणि चारित्र्याला प्राधान्य असेल तसेच हे एक लहानसे घरटे असेल. या घरट्यात पाखरे पिलांना ज्या मायेने अन्न भरवतात त्याच मायेने विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम करण्यायोग्य ज्ञान दिले जाईल. परिपूर्ण माणूस उत्क्रांत करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट असेल. विद्यार्थ्यांवर लोकशाही व धर्मनिरपेक्षतेचे संस्कार करून पुढील भारत घडवण्याचे कार्य येथे केले जाईल. या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनासाठी नांदेड एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली.

१९५३ साली या संस्थेअंतर्गत पीपल्स हायस्कूलची व १९६३ मध्ये विज्ञान महाविद्यालय सुरू करण्यात आले.

आजचा विद्यार्थी पुढील काळातील भारताचा शिल्पकार आहे. त्या दृष्टिकोनातून चांगुलपणा, लोकशाही जोपासणारी पिढी शिक्षणसंस्थेच्या माध्यमातून निर्माण झाली पाहिजे, असे स्वामीजींना वाटे, त्यांच्याच विचारांचा आदर्श मानून सेवाधारी कार्यकर्त्यांची परंपरा येथे कायम आहे.

मुक्ती संग्राम यशस्वी झाल्यानंतर मराठवाड्यामध्ये शिक्षणाच्या माध्यमातूनच खरा विकास घडवून आणता येऊ शकतो, याची जाणीव स्वामीजींना होती. म्हणून त्यांनी त्यादृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली.

मराठवाड्यातील पीपल्स कॉलेज म्हणजे स्वामी रामानंद तीर्थ यांचा आत्मा आहे. आजही नांदेड एज्युकेशन सोसायटी ही स्वामी रामानंद तीर्थ यांनी तयार केलेल्या घटनेप्रमाणे कार्य करते.

धर्म हा ह्रदयाकडून ह्रदयाकडे जातो. स्वयंशासन महत्त्वाचे आहे. शुद्ध अंतकरण असलेल्या शिक्षक देशाला सामर्थ्य देऊ शकतो. जीवनाचे मूल्य बदलले की शिक्षणाची मूल्ये देखील बदलली पाहिजेत. राजकारणापासून अलिप्त राहून विद्यार्थ्यांनी बौद्धिक क्षमतेचा विकास करावा. अशा मौलिक विचारांना स्वामी रामानंद तीर्थ यांनी जीवनात आदर्श मानले.

ब्रह्मचारीपणाचे स्तोम न दाखवता ब्रह्मचारी तत्व जाणूनही खरी आणि कठीण ब्रह्मचारी साधना करण्यात ते यशस्वी झाले. कुठल्याही सिद्धीचा वापर न करता, परमोच्च अवस्था जाणूनही सर्वसामान्य माणसांमध्ये सहजपणे वावरले. सदैव समाधी अवस्था जशी जाणली, तशीच योग्य सुदृढ नैतिक ममत्वतेचे जीवन जगणारा समाधीतच असतो या सत्यापर्यंत ते पोहचले होते. मन नाही-मन आहे अशा जाणीव ठेवणाऱ्या व्यक्तींसोबत राहूनही अहंकार विरहित योगी अत्यंत अवघड असणारी जीवनशैली सहजपणे त्यांनी अंगीकारली.कोणाचाही हेवा नाही, द्वेष नाही,

आसक्ती नाही आणि विरक्तीही नाही अशा स्थितीत ते होते नैनं दहति पावकः या जाणवेला ते पोहोचले होते. मूर्तिपूजा असावी की नसावी? यासंदर्भातील तत्त्वज्ञान त्यांनी चर्चेसाठी महत्त्वाचे मानले नाही.

पीस या मासिकातून स्वामीजींनी आपले विचार व्यक्त केले

पिठापुरम येथे स्थापन केलेल्या शांती आश्रमाला स्वामीजी भेट देत असत. ओंकार स्वामी यांच्याशी त्यांचे सख्य होते. मानवतेच्या हितासाठी विज्ञान व अध्यात्म यांना एकत्र आणणे महत्त्वाचे आहे, हा हेतू समोर ठेवून शांती आश्रमामध्ये रामतीर्थ शांती महाविद्यालय २१ जानेवारी १९६६ रोजी ओंकार स्वामींच्या जन्मदिनी जयप्रकाश नारायण यांच्या हस्ते उद्घाटन करून सुरू करण्यात आले. हे महाविद्यालय दोन वर्षातच बंद पडले याच ठिकाणावरून पुढे खाली ग्राम उद्योगातील कार्यकर्त्यांसाठी उद्बोधन करणारे शिबिरे घेण्यात येऊ लागली.

लालबहादूर शास्त्री व रामतीर्थ यांचा प्रभाव असणाऱ्या व्यक्तींची इच्छा होती की स्वामी रामतीर्थ यांचे एखादी स्मारक असावे यातूनच पुढे त्यासाठी प्रयत्न झाले १९६८ च्या जून महिन्यामध्ये ओंकार स्वामी यांच्या हस्ते पेरीयार गावाजवळील भागीरथी नदीच्या काठावर रामतीर्थांच्या स्मारकाचे अनावरण करण्यात आले.

२३ सप्टेंबर १९५३ रोजी मराठवाडा विद्यापीठाची स्थापना छत्रपती संभाजीनगर येथे झाली. मराठवाड्यामध्ये विद्यापीठ व्हावे असे स्वामी रामानंद तीर्थ यांचे स्वप्न होते. त्यासाठी त्यांनी पाठपुरावा केला होता.

या विद्यापीठाने स्वामीजींना विद्यापीठाच्या दशकपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने डॉक्टर ऑफ लॉज ही पदवी दिली. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते हा सन्मान त्यांनी स्विकारला.

एकूणच स्वामी रामानंद तीर्थ यांचे जीवन चरित्र अभ्यासण्यावर लक्षात येते की, कर्मश्रेष्ठ असते या तत्त्वातून जीवन जगलेल्या या थोर महात्म्याने पीपल्स कॉलेजचे ब्रीद कर्माचे डोळे ज्ञान ते निर्दोष होआवे असे सांगितले. याच तत्वाला महत्त्व देऊन प्रत्येकाने कार्य करावे हे अपेक्षित आहे.

***



## जात्यावरच्या ओव्या......

बैलपोळ्याचा सण
आजी बघून रडती
थरथरत्या हाताने
दोन्ही बैल ओवाळती ||८७०||

आली आली गौराई
घेऊन सुखाची घागर
हिची पाऊले सोन्याची
उमटली घरभर ||८७१||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७६




ज्योतिर्मय साहित्य

थोडक्यात सांगायचे झाले तर श्रीराम म्हणजे कल्पवृक्ष आहेत. कल्पवृक्ष हा इच्छिलेले देणारा असतो. त्याच्या सावलीत बसून आपण काय मागायचे हे आपल्यावर आहे. तो आपल्याला जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती देणारा आहे. कैवल्य प्रदान करणारा आहे. असा हा भगवंत आपल्या पाठीशी असताना आपण देहाची आणि संसाराची व्यर्थ चिंता वाहत असतो. माझे कसे होईल, माझ्या मुलाबाळांचे, नातवंडांचे कसे होईल अशी चिंता आपण करीत बसतो. तर कोणाला या जगाचे कसे होईल अशा प्रकारची चिंता. अशा अनेक प्रकारच्या चिंतांनी सामान्य माणूस गोंधळून जातो.




समर्थ म्हणतात, मनी मानवा व्यर्थ चिंता वाहते, अकस्मात होणार होऊन जाते. प्रारब्धानुसार जे घडायचे असते, ते घडणारच असते. आपण मात्र व्यर्थ चिंता करीत बसतो. त्यापेक्षा आपण त्याच्यावर विश्वास ठेवून सर्व भार त्याच्यावर सोपवावा. याचा अर्थ मात्र असा नाही की आपल्या वाट्याला आलेले कर्म न करता स्वस्थ बसायचे. अर्जुनाला कर्तव्यप्रवण करण्यासाठीच तर भगवंताने गीता सांगितली ना !तेव्हा त्याच्यावर विश्वास ठेवून आपल्या वाट्याला आलेले निहित कर्म उत्तम प्रकारे करावे. तोच पुरुषार्थ आहे. इतर गोष्टी परमेश्वरावर सोपवाव्यात. तुकाराम महाराज म्हणतात, ''घालू देवासीच भार, देव सुखाचा सागर.''मग देहाच्या आणि प्रपंच्याच्या चिंता आपल्याला सतावणार नाहीत.

स्वसंवाद :

१. ''माझे कसे होईल? माझ्या कुटुंबियांचे कसे होईल?'' या विचारसरणीत अडकून मी समर्थांनी म्हटल्याप्रमाणे प्रपंचाची वृथा (व्यर्थ) चिंता करत बसलो आहे का?

२. संकटाच्या काळात मी एका पामरासारखा विचलित होऊन खचून जातो, की भगवंतावर संपूर्ण भार टाकून खंबीरपणे परिस्थितीचा सामना करतो?

३. कल्पवृक्षाप्रमाणे असणाऱ्या श्रीरामाच्या चरणी आल्यावर मी त्याच्याकडे केवळ तात्पुरती ऐहिक सुखे मागतो आहे, की चिरंतन शांती आणि मोक्षाची आस धरतो आहे?

४. तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे, ''देव सुखाचा सागर'' आहे यावर माझा पूर्ण विश्वास आहे का? मी माझे निहित कर्म करून उरलेला भार त्याच्यावर सोपवायला शिकलो आहे का?

(क्रमशः)




## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559



✍ मैत्री

मैत्रीचे संबंध टिकवण्यासाठी
शंका उपस्थित करू नका
जिथे विश्वास असतो तेथे
शंकेला स्थान नसते मग
गैरसमज होणार नाहीत आणि
मैत्री आयुष्यभर टिकेल. मैत्रीचे
नाते सर्वात श्रेष्ठ असते.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## नामाचे सूक्ष्म स्वरूप



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वत:च्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता' राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दु:खाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदु:खाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

### आपले सण आपले उत्सव
### पितृपक्ष

अर्थात कृतूदक्ष वसु सत्य काम काल ध्रुव धुरी रचना आद्रव आणि पुरुवा हे श्राद्धात पुजले जाणारे विश्व देव सांगितले आहेत विविध प्रकारच्या शास्त्रात यातील एका जोडीची पूजन होते म्हणून श्राद्धात प्रथम विश्वे देवाला आवाहन करण्यात येते.

जशी गर्भिणी स्त्री अधिकचा आहार ग्रहण करून पोटातील गर्भाला अन्नपूर्ती करते तसे हे विश्व देव अन्न पित्रा पर्यंत पोहोचवितात ज्या ब्राह्मणाला श्राद्धासाठी निमंत्रित केले आहे त्याच्या शरीरात वायुरूपाने ते प्रवेश करतात व अन्नग्रहण करतात.

श्राद्धाच्या दरम्यान हे पितृगण आपण जीवीत असताना केलेल्या पाप कर्माचा पश्चाताप करतात व मुलाकडून पायसाची अपेक्षा करतात.

गरुडाने विचारले की, हे स्वामी मला हे सांगा की, पितृगण ज्या लोकात आता आहेत तिथून येऊन श्राद्धात भोजन करताना काय कोणी पाहिले आहे? त्यावर भगवान म्हणाले या प्रश्नाच्या उत्तरात मी तुला सीतेचे उदाहरण देतो. एकदा वनात वास्तव्यात असताना राम लक्ष्मण व सीता पुष्कर तीर्थाला आले तिथे आपल्या वडिलांसाठी श्राद्धविधी करण्याचे रामाने ठरविले. (क्रमश:)




✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### "एक पत्र बापाचे मुलाला"

मित्रांनो, आपल्यापैकी बर्याच जणांनी शाळेत तसबिरमधे लावलेले अब्राहम लिंकनने हेड-मास्तरला लिहिलेले पत्र वाचले असेल. तसेच काहीसे एक पत्र मी थोडक्यात तुम्हाला वाचन करण्यासाठी देत आहे.या दुनियेत असा एकही मणुष्य नाही ज्याच्या जीवनात दुःख अडचणी नाहीत, आपण तर साधारण मणुष्य, सर्व गोष्टी माझ्या मनाप्रमाने झाल्या पाहिजे हा आग्रह दुःखाचे कारण आहे. आपण सर्वासी चांगले वागा.जी माणसे परिस्थितीला स्वतःची ताकद बनवतात, तिच यशस्वी होतात. यामुळे बाप लिहितो; जेव्हा सगळे तुझ्या विरोधात असतील व तुला दोष देत असतील, तर ही पृथ्वी व त्यातील प्रत्येक गोष्ट तुझीच होईल! सर्वाना संशय घेऊ दे, त्याचा फायदा तू स्वतःला घडविण्यासाठी कर! तुझ्या बद्दल खोट्या गोष्टी पसरावीत असतील व तू खोटे बोलत नसशील तर सर्व तुला मिळेल! स्वार्थी लोकांनी बदललेल्या गोष्टी स्विकारण्याचे धैर्य जर तुझ्याकडे असेल तर तू एक परिपूर्ण माणूस होशील!जर सामान्यासी तू सहज संवाद साधू शकलास तर,शत्रू किंवा मित्र तुला दुखवू शकत नाही!गरिबांना तू विसरत नसशील,सगळे तुला जर समान असतील, आणि जर तू जीवनातला प्रत्येक बहुमोल क्षण विधायक कार्यासाठी वापरशील तर..
तर बाळा, ही पृथ्वीवरील प्रत्येक गोष्ट तुझीच होईल आणि विशेष म्हणजे तू एक पूर्ण माणूस म्हणून तू स्वतःला धन्य समजशील!" तर असे हे एक पत्र. कसे वाटले.. गूड़ डे गुड मार्निग स्वस्थ राहा मस्त राहा आणि सुखदुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा.



## गुणकारी आलं (अद्रक )

ज्योतिर्मय साहित्य

आल्याचा वापर करून शरीरातील युरीक ॲसिड करू शकता कमी, जाणून घ्या सेवनाची पद्धत

आजकाल शरीरात यूरिक ॲसिड वाढणं ही एक कॉमन समस्या झाली आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी आणि चुकीची लाइफस्टाईल यामुळे अनेकांना ही समस्या होते. जेव्हा शरीरात यूरिक ॲसिड वाढतं तेव्हा सांधे, जॉईंट्समध्ये वेदना आणि सूज अशा समस्या होतात. जर वेळीच यावर उपचार केले नाही तर ही समस्या आणखी वाढू शकते. यूरिक ॲसिड कंट्रोल करण्यासाठी तुम्ही काही घरगुती उपायही करू शकता. जवळपास सगळ्याच किचनमध्ये मिळणारी एक गोष्टी ही समस्या दूर करू शकते. ही गोष्ट म्हणजे आलं.

यूरिक ॲसिड कमी करतं आलं

आल्याच्या चहापासून ते वेगवेगळ्या पदार्थांमध्ये समावेश केला जातो. याने पदार्थांची टेस्ट तर वाढतेच सोबच यात अनेक औषधी गुणही असतात. यातील अँटी-इन्फ्लेमेटरी आणि अँटी-ऑक्सिडेंट ने शरीरातील सूज कमी होते. तसेच आल्याने पचनक्रियाही चांगली होते. शरीरातील विषारी पदार्थ सुद्धा बाहेर निघण्यास मदत मिळते.

आलं कसं करतं काम?

आल्यामध्ये जिंजरोल्स नावाचं एक शक्तीशाली तत्व असतं, जे शरीरात यूरिक ॲसिड जमा होण्यापासून रोखतं. हे तत्व यूरिक ॲसिडचे क्रिस्टल बनण्याची प्रक्रिया हळूवार करतं. ज्यामुळे जॉईंट्समध्ये वेदना आणि सूज कमी होते. तसेच याच्या मदतीने शरीरात रक्तप्रवाह सुद्धा सुरळीत होतो. इतकंच नाही तर शरीरातील विषारी पदार्थ सुद्धा बाहेर निघतात.

आल्याचं सेवन करण्याची योग्य पद्धत

आल्याचं सेवन वेगवेगळ्या प्रकारे तुम्ही करू शकता. मात्र, याचा योग्य पद्धतीने वापर करणं गरजेचं आहे. तेच जाणून घेऊया...

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

आल्याचा चहा

आल्याचा चहा यूरिक ॲसिड कमी करण्यासाठी एक बेस्ट उपाय आहे. यासाठी ताज्या आल्याचे छोटे-छोटे तुकडे करा आणि ते पाण्यात उकडून घ्या. तुम्हाला हवं तर तुम्ही यात थोडं मध आणि लिंबाचा रसही टाकू शकता. याच चहाचं दिवसातून दोन वेळा सेवन करा.

आलं आणि हळदीचं मिश्रण

आलं आणि हळद दोन्हींमध्ये अँटी इन्फ्लेमेटरी गुण भरपूर असतात. या दोन्हींचं मिश्रण करून एक पेस्ट बवा आणि ही पेस्ट कोमट पाण्यात टाकून सेवन करा. याने यूरिक ॲसिड कमी करण्यास मदत मिळते.

आल्याचा रस

ताज्या आल्याचा थोडा रस काढून त्यात थोडा लिंबाचा रस टाका. हा रस सकाळी रिकाम्या पोटी सेवन करा. याने शरीर आतून डिटॉक्स होईल आणि यूरिक ॲसिडही कंट्रोल होईल.

आल्याचं तेल

आल्याचा तेलाचा सुद्धा तुम्हाला जॉईंट्समधील सूज आणि वेदना कमी करण्यास करू शकता. या तेलाने जॉईंट्सवर हलक्या हाताने मालिश करा. याने ब्लड सर्कुलेशन चांगलं होतं आणि वेदनाही कमी होतात.

काय काळजी घ्या?

आल्याचं जास्त सेवन केल्याने पोटात जळजळ होऊ शकते. त्यामुळे याचं सेवन कमी प्रमाणात करा.

जर तुम्हाला आरोग्यासंबंधी एखादी गंभीर समस्या असेल तर आल्याचं सेवन करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

****

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### भावपुष्प

हळव्या,कोमल मनाने
नित्य नियमाने देवास
भावपुष्प अर्पण करते
चरणी डोके ठेवून
नतमस्तक उभे राहूनी
मनोभावे प्रभूस वंदिते

शब्दा शब्दांची अलवार
सुंदर,छान माळेत
भावपुष्प मनातले गुंफते
साधी सोपी रचना
शब्द मऊ मखमली
वाचताना मन आनंदते

ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ
Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २०४ वा ❑ भारतीय सौर दिनांक ११ आश्विन शके १९४८, शनिवार दि.०३ ऑक्टोंबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

# मृत्यूच्या विळख्यातून फ्लाईदुबईला वाचवणारा भारतीय हिरो!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

३० सप्टेंबर रोजी 'फ्लायदुबई'चे '१०७३' हे बोईंग ७३७ मॅक्स ८ विमान १७४ प्रवाशांना घेऊन दुबईहून इस्रायलमधील तेल अवीवकडे जात होते. उड्डाणादरम्यान कॉकपिटमध्ये असलेल्या ओमानी सह-पायलटने अचानक मुख्य कॅप्टन स्मित मच्छार यांच्यावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला चढवला.

ही थरारक घटना फ्लाईदुबईच्या विमान १०७३ मध्ये घडली आहे, जिथे एका भारतीय वैमानिकाने स्वतःच्या प्राणाची बाजी लावून १८० हून अधिक प्रवाशांचे प्राण वाचवले. या शूर भारतीय सुपुत्राचे नाव कॅप्टन स्मित मच्छार असे असून ते मूळचे मुंबई (घाटकोपर) येथील रहिवासी आहेत.

शरीरावर अनेक गंभीर जखमा आणि प्रचंड रक्तस्राव होत असतानाही कॅप्टन स्मित मच्छार यांनी अत्यंत प्रसंगावधान राखले. त्यांनी तातडीने कॉकपिटचा दरवाजा उघडणारा मुख्य 'डोर रिलीज' स्विच ऑन केला. कॉकपिटचा दरवाजा उघडताच बाहेर असलेल्या केबिन क्रू आणि प्रवाशांनी तातडीने आत धाव घेतली आणि सह-पायलटला पकडले.

फ्लाईदुबईच्या एफझेड १०७३ या घटनेच्या मागे त्या विमानाचा ओमानी सह-वैमानिक होता. ३० सप्टेंबर २०२६ रोजी दुबईहून तेल अवीवला जाणाऱ्या या विमानामध्ये त्याने भारतीय मुख्य वैमानिक स्मित मच्छार यांच्यावर चाकूने हल्ला करून विमान अपघातग्रस्त किंवा हायजॅक करण्याचा प्रयत्न केला होता. विमान हवेत असताना सह-वैमानिकाने अचानक मुख्य पायलट स्मित मच्छार यांच्यावर धारदार शस्त्राने खूनी हल्ला केला.या प्राणघातक हल्ल्यादरम्यान विमानाचे नियंत्रण बिघडल्याने विमान काही सेकंदातच हजारो फूट खाली घसरले.

गंभीर जखमी झाले असतानाही कॅप्टन मच्छार यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानाने कॉकपिटचा दरवाजा उघडला. त्यानंतर विमानातील क्रू मेंबर्स आणि प्रवाशांनी तातडीने आत घुसून हल्लेखोर सह-वैमानिकाला पकडले आणि त्याला जागीच बांधून ठेवले.या धाडसामुळे विमानातील सर्व १७४ प्रवाशांचे प्राण वाचले. त्यानंतर हे विमान सौदी अरेबियाच्या तबुक विमानतळावर सुरक्षितपणे उतरवण्यात आले. हल्लेखोर ओमानी सह-वैमानिकाला सौदी अरेबियाच्या सुरक्षा यंत्रणांनी ताब्यात घेतले असून त्याच्यावर चौकशी सुरू आहे. संयुक्त अरब अमिरातीचे अभियोजक आणि इतर आंतरराष्ट्रीय यंत्रणा या घटनेमागे काही दहशतवादी कट होता का, याचा उच्चस्तरीय तपास करत आहेत.

सध्या सौदी अरेबिया, यूएई आणि इस्रायलच्या तपास यंत्रणा या घटनेमागे काही दहशतवादी कट होता का, या कोणावरून सखोल तपास करत आहेत.

ओमान आणि इस्त्राईल मध्ये राजनैतिक संबध नसताना ओमानचा पायलट इस्राएलचा विमान कसे काय चालवत होता,हा प्रश्न समोर आला आहे .इस्त्राईल आणि यांच्यात २०२० मध्ये (अब्राहम करारांतर्गत) राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले. या विमान सेवेच्या करारात स्पष्ट नियम आहे की, इस्त्रायलला जाणाऱ्या विमानांचे पायलट केवळ अशाच देशांचे असावेत ज्यांचे इस्त्राईलसोबत राजनैतिक संबंध आहेत.

ओमानचे इस्त्राईलसोबत संबंध नाहीत. त्यामुळे या ओमानी सह-वैमानिकाला इस्त्राईलच्या मार्गावरील फ्लाइट १०७३ वर ड्युटी देणे हा विमान वाहतूक कराराचा आणि सुरक्षा नियमांचा गंभीर भंग मानला जात आहे.

विमानाचे नियंत्रण इतर कर्मचाऱ्यांनी मिळवल्यानंतर, विमानाचे सौदी अरेबियामध्ये सुरक्षित इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. तो ओमानी पायलट सध्या सौदी अरेबियाच्या ताब्यात असून तिथे त्याची चौकशी सुरू आहे. इस्त्रायली गुप्तहेर संघटना शिन बेत आणि मोसाद या प्रकरणात च्या सुरक्षा त्रुटींची आणि दहशतवादी कनेक्शनची चौकशी करत आहेत. या घटनेनंतर इस्त्राईलने तात्पुरत्या स्वरूपात च्या विमानांना बंदी घातली आहे.

या घटनेनंतर इस्त्राईलच्या सुरक्षा यंत्रणांनी तीव्र आक्षेप घेतला असून, फ्लायदुबईने या सुरक्षा नियमाचे उल्लंघन कसे केले आणि ओमानी वैमानिकाला इस्त्राईलच्या विमानावर कसे काय पाठवले, याची मोसाद आणि शिन बेट यांसारख्या गुप्तचर संस्थांमार्फत संयुक्त चौकशी सुरू आहे. सुरक्षेच्या कारणास्तव इस्त्राईलने फ्लायदुबईच्या विमानांवर तात्पुरती बंदीही घातली आहे. कॅप्टन स्मित मच्छार हे अतिशय अनुभवी कमर्शियल पायलट आहेत.त्यांनी यापूर्वी भारतात स्पाइसजेट एअरलाइन्समध्ये वरिष्ठ कमांडर म्हणून ११ वर्षे सेवा दिली आहे. त्यांच्याकडे ९,५०० पेक्षा जास्त तास विमान उडवण्याचा दांडगा अनुभव आहे. ते जून २०२२ पासून फ्लाईदुबईमध्ये कॅप्टन म्हणून कार्यरत आहेत. या घटनेनंतर इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जागतिक नेत्यांनी कॅप्टन स्मित यांच्या अद्भूत शौर्याचे कौतुक केले असून त्यांना रिअल हिरो म्हटले आहे. सध्या त्यांच्यावर सौदी अरेबियातील रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे

# बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉइज ऑर्गनायझेशनचे द्वैवार्षिक अधिवेशन संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉइज ऑर्गनायझेशन (बोमरेओ) या बँक ऑफ महाराष्ट्र मधील निवृत्त कर्मचाऱ्यांचे द्वैवार्षिक अधिवेशन पद्मावती येथील ''लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह'' येथे नुकतेच संपन्न झाले.

यावेळी संघटनेचे सरचिटणीस नारायण आचलेरकर यांनी संघटनेच्या स्थापनेपासूनचा २७ वर्षांचा इतिहास उपस्थित सभासदांना सांगितला.

१९९९ साली स्थापन झालेल्या ह्या संघटनेने २०२४ साली रौप्यमहोत्सव साजरा केला आहे.या काळात सुरू केलेल्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी सांगितली.

पूर्वांचल मधील मुलींना पुण्यात विविध प्रकारे आर्थिक मदत केली जाते,तळेगाव दाभाडे येथील संजीवनी वसतिगृहातील शाळकरी मुलींना ड्रेस साठी कापड आणि शिलाई साठी दरवर्षी रक्कम दिली जाते.सामाजिक कृतज्ञता निधी समर्पण साडे तीन कोटी रुपयांवर केले आहे हे आवर्जून सांगितले.सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना संघटनेतर्फे आर्थिक मदत




केली जाते.

शेतकऱ्यांसाठी कृषिमित्र ही बँकेतील निवृत्त कृषी अधिकाऱ्यांची एक चळवळ आहे.

राजगड तालुक्यातील गुहिनी या गावात कुक्कुट पालन आणि मधमाशी पालनासाठी हे सर्व अधिकारी मार्गदर्शन आणि आर्थिक साहाय्य करत असतात.या सर्व समाजकार्यासाठी सर्व निधी आमचे सभासद स्वतःच्या निवृत्तीवेतनातून देत असतात. सभासदांच्या पंचाहत्तरी निमित्त संघटनेकडून सत्कार करून सन्मानित केले जाते.

संघटनेचे संस्थापक बाळासाहेब फडणवीस यांनी दिलेल्या विचाराप्रमाणे ज्या समाजाने आपल्याला आज जी प्रतिष्ठा दिली आहे,त्या समाजाचे ऋण फेडण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न आहे असे अचलेरकर यांनी आवर्जून सांगितले.

कार्यकारी संचालक प्रभात किरण यांनी बोमरेओ संघटनेबद्दल गौरवपर उद्गार काढले.निवृत्त बँक सभासदांनी घातलेल्या भरभक्कम पायावर बँक ऑफ महाराष्ट्र उभी असून बँकेच्या भारतभर २८०० शाखा आता कार्यरत आहे.बँकेचा नक्त नफा सात हजार कोटीपेक्षा जास्त झाला आहे.असे त्यांनी नमूद केले.आणि रिझर्व्ह बँकेने बँकिंग संबंधी जी प्रमाणके आहेत ती सर्व पूर्ण केली आहेत असे प्रभात किरण यांनी आपल्या भाषणात सांगितले.

बँकेचे संचालक प्रसेनजीत फडणवीस म्हणाले,बँकर हा नोकरीत असतांना पगारी समाज सेवक असतो. पण निवृत्तीनन्तर देखील तो स्वखर्चाने (आपल्या निवृत्तीवेतनातून खर्च करून ) समाजासाठी विधायक कार्य करत असतो या बद्दल बँकेचे संचालक प्रसेनजीत फडणवीस यांनी समाधान व्यक्त केले.

''सामाजिक कृतज्ञता निधी'' साडे तीन कोटी संकलित करून समाजासाठी समर्पण केला याबद्दल यांनी सभासदांचे अभिनंदन केले.आताचे बँकिंग हे पारंपरिक बँकिंगपेक्षा खुप वेगळे असून त्याच्याशी जुळवून घ्यायला हवे असा सल्ला त्यांनी निवृत्तांना दिला.

संघटनेत विविध जबाबदाऱ्या अनेक वर्षे समर्थपणे पार पाडणाऱ्या १९ जणांचा सत्कार संस्थापक बाळासाहेब फडणवीस यांच्या हस्ते करून गौरविण्यात आले.

कार्याध्यक्ष भास्कर माणकेश्वर यांनी निवृत्तांच्या प्रश्नांबाबत बँकेचे व्यवस्थापन दुर्लक्ष करीत असून निष्काळजीपणा दाखवत आहे,याची अनेक उदाहरणे दाखवून त्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

या अधिवेशनास भारतभरातून सातशे प्रतिनिधी उपस्थित होते.

याच अधिवेशनात पुढील दोन वर्षांसाठी नवीन कार्यकारिणी निर्वाचन अधिकारी मुकुंद भालेराव यांनी घोषित केली.त्यामध्ये मोहन घोळवे हे अध्यक्ष,नारायण आचलेरकर हे कार्याध्यक्ष तसेच डॉ.सुनील देशपांडे सरचिटणीस म्हणून राहतील.ही कार्यकारिणी पुढील दोन वर्षासाठी राहील. व्यासपीठावर भारतीय मजदूर संघाचे सागर पवार,

बोमोच्या अश्विनी देव,महादेव शेडगे,भास्कर माणकेश्वर,डॉ चंद्रशेखर बारगजे यांची मुख्य उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरवात चंद्रशेखर बोरोले यांच्या श्रमिक गीताने झाली.सुमेधा दफ्तरदार यांच्या पसायदानाने अधिवेशनाचा समारोप करण्यात आला.सूत्र संचालन शुभांगी कुलकर्णी यांनी केले.

# डॉ. मीना श्रीवास्तव यांच्या अनुवादित पुस्तकाला 'आशीर्वाद पुरस्कार'

ज्योतिर्मय साहित्य

मुंबई – वंदना प्रकाशन मुंबईतर्फे २७व्या आशीर्वाद पुरस्कारात या वर्षीपासून सर्वोत्कृष्ट हिंदी साहित्य निर्मितीसाठी पुरस्कारांचा शुभारंभ करण्यात आला आहे. २०२४-२५ सालच्या पुस्तकांचा यात अंतर्भाव आहे. यातील संकीर्ण ऐतिहासिक अनुवाद या श्रेणीत डॉ. मीना श्रीवास्तव यांच्या ''भारतीय स्वतंत्रता आंदोलन की अनकही कहानियाँ'' या हिंदी अनुवादित पुस्तकाला आशीर्वाद पुरस्कार घोषित झाला आहे. प्रा. हेमंत सामंत यांच्या लेखमालेवर आधारित या पुस्तकात भारतातील आणि विदेशातील क्रांतिकारकांच्या वीरगाथांचे वर्णन आहे. महत्वाचे हे की पुस्तकातील ३८ प्रकरणांत समाविष्ट केलेले हे बहुसंख्य वीर आणि वीरांगना अनामिक आहेत. त्यांनी देशासाठी केलेल्या सर्वोच्च त्याग आणि बलिदानाला न्याय मिळवून देणाऱ्या या पुस्तकाला हा मानाचा पुरस्कार मिळतो आहे, हा काव्यगत न्याय म्हणावा लागेल. वंदना प्रकाशन, मुंबईचे संस्थापक आणि आशीर्वाद पुरस्कार चे प्रवर्तक डॉ. सुनील सावंत यांनी नुकतीच आशीर्वाद पुरस्कार विजेत्यांची घोषणा केली.

हिंदी साहित्य निवड समितीचे अध्यक्ष डॉ. बीरेंद्र प्रताप सिंह यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने सदर पुस्तकाची निवड केली. डॉ. मीना श्रीवास्तव यांना हा पुरस्कार येत्या २९ नोव्हेंबरला मुंबईत होणाऱ्या आशीर्वाद पुरस्कार समारोहात प्रदान करण्यात येईल. डॉ. श्रीवास्तव यांना प्राप्त झालेल्या या यथोचित सन्मानाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.




# हृदयरोगावरील ईसीपी व किलेशन थेरपीचे केंद्र आता छत्रपती संभाजीनगरमध्ये

## नांदेड येथील दत्तकृपा सेंटरची दुसरी शाखा सुरू; हृदयरुग्णांसाठी उपचाराची सुविधा

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : हृदयरोगावरील ईसीपी अर्थात अमेरिकन मान्यता प्राप्त ईईसीपी थेरपी आणि किलेशन थेरपीची सुविधा आता छत्रपती संभाजीनगर येथे उपलब्ध झाली आहे. नांदेड येथील दत्तकृपा सेंटरने डॉ. व्यवहारे ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, एन-२, मायानगर, क्रिकेट ग्राउंडसमोर, कामगार चौक येथे आपली दुसरी शाखा सुरू केली आहे. या केंद्रामार्फत छत्रपती संभाजीनगरसह परिसरातील जिल्ह्यांतील रुग्णांना ईईसीपी व किलेशन थेरपीची सुविधा उपलब्ध होणार असल्याची माहिती संचालक डॉ. विलास पंडितराव धर्माधिकारी यांनी दिली.

डॉ. धर्माधिकारी यांच्या माहितीनुसार, ज्या रुग्णांची अँजिओप्लास्टी किंवा बायपास शस्त्रक्रिया होऊ शकत नाही, तसेच अँजिओप्लास्टी किंवा बायपास झाल्यानंतरही छातीत दुखणे, दम लागणे यांसारख्या तक्रारी असतात, अशा रुग्णांसाठी ईसीपी उपचारपद्धतीचा विचार केला जाऊ शकतो. हार्ट फेल्युअर असलेल्या काही रुग्णांमध्येही या उपचाराचा उपयोग होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

ईसीपी उपचारादरम्यान रक्तप्रवाहाला चालना देण्याच्या प्रक्रियेमुळे हृदयाला होणारा रक्तपुरवठा सुधारण्यास मदत होऊ शकते. मात्र, रुग्णाची प्रकृती, आजाराची तीव्रता आणि इतर




उपचारपद्धती यांचा विचार करून तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच उपचार घेणे आवश्यक आहे.

किलेशन थेरपीमध्ये विशिष्ट औषध शिरेद्वारे दिले जाते. हे औषध शरीरातील काही धातू किंवा खनिजांशी बांधले जाऊन त्यांचे शरीरातून उत्सर्जन होण्यास मदत करते. या उपचाराचा वैद्यकीय वापर प्रामुख्याने काही प्रकारच्या धातूंच्या विषबाधेसाठी केला जातो.

दत्तकृपा सेंटरच्या माहितीनुसार, ईईसीपी व किलेशन थेरपीसोबत निरोगी जीवनशैली, संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि आवश्यक औषधोपचार यावरही भर दिला जातो.

डॉ. विलास पंडितराव धर्माधिकारी हे बी.ए.एम.एस., पी.पी.एच.सी. (अपोलो हॉस्पिटल, हैदराबाद), एम.बी.ए. (हेल्थ केअर सर्व्हिसेस), प्रिव्हेंटिव्ह कार्डिओलॉजी फेलोशिप तसेच ईईसीपी व किलेशन थेरपी क्षेत्रातील अनुभव असलेले वैद्यकीय व्यावसायिक आहेत..

ईईसीपी थेरपी कुणासाठी?

ज्यांची अँजिओप्लास्टी किंवा बायपास शस्त्रक्रिया होऊ शकत नाही.

अँजिओप्लास्टी किंवा बायपास झाल्यानंतरही छातीत दुखणे, दम लागणे यांचा त्रास असलेले काही रुग्ण.

हार्ट फेल्युअर असलेले रुग्ण, विशेषतः हृदयाची पंपिंग क्षमता कमी झालेल्या रुग्णांमध्ये.

हृदयाचे स्नायू कमजोर झालेल्या रुग्णांसाठी तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार.

लैंगिक दौर्बल्य किंवा लैंगिक शिथिलतेचा त्रास असलेल्या रुग्णांसाठी.

अर्धांगवायूमुळे शरीराच्या एखाद्या भागात कमजोरी आलेल्या रुग्णांसाठी.

किलेशन थेरपी म्हणजे काय?

किलेशन थेरपीमध्ये विशिष्ट औषध शिरेद्वारे शरीरात दिले जाते. हे औषध शरीरातील काही धातू किंवा खनिजांशी बांधले जाते आणि त्यानंतर ते पदार्थ मूत्रावाटे शरीरातून बाहेर टाकण्यास मदत होते. वैद्यकीय क्षेत्रात किलेशन थेरपीचा वापर विशेषतः काही प्रकारच्या धातूंच्या विषबाधेच्या उपचारासाठी केला जातो.

संपर्क : दत्तकृपा क्लिनिक, डॉ. व्यवहारे ऑर्थोपेडिक हॉस्पिटल, एन-२, मायानगर, क्रिकेट ग्राउंडसमोर, कामगार चौक, छत्रपती संभाजीनगर.

मो. ९६५७९ २८५६५

****

# राजीव गांधी महाविद्यालयात गणेश उत्सव विविध कार्यक्रमानी साजरा




**ज्योतिर्मय साहित्य**

करमाड – येथील राजीव गांधी महाविद्यालयात सलग तिसऱ्या वर्षी १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर दरम्यान गणेश उत्सव मोठ्या जल्लोषात विविध कार्यक्रमानी साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने प्रा. मनोज देवकर व प्रा.डॉ.जयश्री पाटील यांच्या पुढाकारातून या वर्षी गणेश उत्सव २०२६ साजरा करताना विविध स्पर्धा व उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचारी यांनी स्वखर्चाने या गणेश उत्सवाचे आयोजन केले होते.

गणेश उत्सवा दरम्यान संगीत खुर्ची, रांगोळी, निंबू चमचा प्रश्नमंजुषा, वन मिनिट शो, निबंध इ स्पर्धा घेण्यात आल्या. याशिवाय उत्सवादरम्यान संस्थेचे संस्थापक सचिव स्व. डॉ. प्रमोद जोशी यांच्या नावे व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये डॉ. नानासाहेब लावंड कौटिल्याचे अर्थशास्त्र व सद्यस्थिती,

डॉ. अतुल मोरे.. मॅथेमॅटिक्स फॉर संस्टेनबल डेव्हलोपमेंट, डॉ. इमरान पठाण. भारतीय संस्कृती एवं जीवनमूल्ये, डॉ. निखिल साबळे. उद्योगा मधील भौतिकशास्त्राचे प्रमुख उपयोजन, प्रा. मनोज देवकर. अँटी रॅगिंग धोरण व शिक्षा, डॉ.ज्ञानेश्वर कोठुळे. शिवकालीन प्रशासन, डॉ.सुखदेव पोटदुखे.. मराठवाड्यातील संत परंपरा, प्रा. रामदास घोडके भारतीय मान्सून व अल निनो इ. व्यापक विषयावरील व्याख्यानाचा समावेश होतो.

गणेश उत्सवा दरम्यान विविध मान्यवरांनी महाविद्यालयास भेट देऊन गणेश आरती मध्ये सहभाग घेतला. यामध्ये करमाड येथील प्रशासकीय सरपंच सौ. प्रमिला मुळे, श्री गणेश मुळे, जिल्हा परिषद सदस्य सौ साधना कुलकर्णी व श्री. रवि कुलकर्णी, उद्योजक श्री भगवान मुळे, माजी उपसरपंच सुनील तारो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ.भारत खंदारे व प्रो.डॉ.व्यंकटेश लांब प्रा. डॉ. संजीव शिंदे, कॉंग्रेस सेवा दलाचे अध्यक्ष मा विलासराव औताडे, माजी सरपंच श्री. कैलास उकिरडे इ.नी गणेश उत्सव व विविध उपक्रमाचे कौतुक केले.

दिनांक २३ सप्टेंबर रोजी महाविद्यालयातील विद्यार्थी व परिसरातील नागरिकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते.

विसर्जन प्रसंगी कॉलेज प्रवेशद्वारापर्यंत वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.

या उत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात प्रा. मनोज देवकर, डॉ जयश्री पाटील, डॉ.कालिदास फड,डॉ. ललित गोल्डे, डॉ. नानासाहेब लावंड, डॉ. लक्ष्मण खरात, प्रा. प्रशांत माठे, श्री. अर्जुन चव्हाण, श्री.गणेश कुऱ्हाडे,डॉ. इमरान पठाण, डॉ, रमेश कचरे, डॉ. किशोर काळे, डॉ, सौरभ चव्हाण, डॉ, अमित राऊत, डॉ. नितीन मुळे, डॉ. अतुल मोरे, डॉ निखिल साबळे, डॉ. योगेश शिंदे. डॉ. प्रकाश बांगर, प्रा. तन्मय भावसार, डॉ. सुखदेव पोटदुखे, प्रा. रामदास घोडके, श्रीमती रोहिणी जोशी,शिवकुमार मुक्तापुरे, श्रीमती सुनीता पारेकर, श्रीमती अलका कुलकर्णी, श्री.कैलास जाधव, रमेश जाधव मधुकर राठोड, ज्ञानेश्वर जाधव यांनी परिश्रम घेतले. संस्था सचिव डॉ शैलजा जोशी व प्राचार्य डॉ सदाशिव मुळे यांचे उत्सवासाठी मार्गदर्शन लाभले.




# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि महाविद्यालयात नवप्रवेशितांसाठी दीक्षारंभ कार्यक्रम उत्साहात




**ज्योतिर्मय साहित्य**

परभणी – येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषि महाविद्यालय येथे शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी दीक्षारंभ कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले. अध्यक्ष व उद्घाटक म्हणून कुलगुरू डॉ. इंद्र मणि उपस्थित होते. त्यांनी कृषि क्षेत्रात एआय, ड्रोन तंत्रज्ञान, रिमोट सेन्सिग, जीआयएस, डिजिटल शेती, प्रिसिजन फार्मिंग,

जैवतंत्रज्ञान आणि डेटा–आधारित शेतीमुळे होत असलेल्या परिवर्तनाचा उल्लेख करून विद्यार्थ्यांनी हे तंत्रज्ञान आत्मसात करून शेतकऱ्यांच्या समस्या सोडवाव्यात. कृषि शिक्षण हे नोकरीपुरते मर्यादित न ठेवता रोजगार निर्मिती आणि उद्योजकतेकडे वळावे, असा संदेश दिला. महाराष्ट्र शासनाच्या स्मार्ट प्रोजेक्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. उमाकांत दंगट यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले. अधिष्ठाता डॉ. प्रवीण वैद्य यांनी दीक्षारंभाचे महत्त्व स्पष्ट करून नियमित अभ्यास, प्रात्यक्षिके, क्षेत्रभेटी आणि शिस्तीवर भर देण्यास सांगितले. माजी अधिष्ठाता डॉ. यू. जी. कुलकर्णी, कृषिभूषण सागर सोनवणे, डिमिटर ॲग्रोसायन्सेसचे विनोद पाथ्रीकर, जगदीश गायकवाड व गोसेवक शिवप्रसाद कोरे यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. दिलीप झाटे व मकरंद भोगावकर यांनी केले. सूत्रसंचालन शुभांगी शुक्ला व आराध्या सिंह यांनी केले तर आभार डॉ. अनुराधा लाड यांनी मानले.







## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### माणुसकी - सर्वात मोठी संपत्ती

आजच्या जगात माणसाची किंमत अनेकदा त्याच्याकडे किती पैसा आहे, कोणतं पद आहे, किती मोठं घर आहे आणि किती लोक त्याला ओळखतात यावर ठरवली जाते.
पण आयुष्याच्या एखाद्या कठीण वळणावर गेल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते–
पैसा औषध विकत घेऊ शकतो; पण काळजी घेणारा हात नाही.
मोठं घर मिळवून देऊ शकतो; पण घरपण देऊ शकत नाही.
पद मिळवून देऊ शकतो; पण मनातला आदर विकत घेता येत नाही.
म्हणूनच माणुसकी ही माणसाची सर्वांत मोठी संपत्ती आहे
माणुसकीसाठी श्रीमंत असण्याची गरज नसते.
तुमच्याकडे पैसा नसेल, तरी वेळ देऊ शकता.
वेळ नसेल, तरी प्रेमाने दोन शब्द बोलू शकता.
काही देण्यासारखं नसेल, तरी कुणाचं दुःख ऐकून घेऊ शकता.
कधी कधी माणसाला उपाय नको असतो...
फक्त “मी तुझ्यासोबत आहे” एवढं ऐकायचं असतं.
आज आपण डिजिटल जगात खूप जोडले गेलो आहोत; पण मनाने मात्र अनेकदा दूर जात आहोत. हजारो संपर्क मोबाईलमध्ये असतात, पण मन मोकळं करण्यासाठी एखादा माणूस सापडत नाही.
म्हणून आपल्या आयुष्यात माणसं वाढवण्यापेक्षा आपलेपणा वाढवूया.
घरातल्या वृद्धांना वेळ द्या.
मुलांचं बोलणं मध्येच थांबवू नका.
कर्मचाऱ्याशीही माणूस म्हणून वागा.
चूक झालेल्याला संधी द्या.
गरजूला मदत करताना त्याचा स्वाभिमान जपा.
कारण मदत मोठी असण्यापेक्षा तिच्यामागची भावना मोठी असते.
कदाचित उद्या आपल्यालाही कुणाच्या मदतीची गरज पडेल.

## ॥ श्री गणेश चिंतन ॥



*समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"*

**कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे**

दासबोधातील शारदास्तवनातही समर्थ शेवटी अशा तत्त्वाकडे नेतात
जे परमार्थमार्गीचा विचार-निवडून, दावी सारासार ।
भवसिंधूचा पैलपार ।पाववी शब्दबळें ॥ १२॥
ही ओवी तर आपल्या आजच्या विषयाला अगदी घट्ट जोडते.
“शब्दबळें भवसिंधूचा पैलपार” शब्द योग्य रीतीने समजला–
→ विचार जागतो→ सारासार विवेक होतो
→ परमार्थाचा मार्ग स्पष्ट होतो→
भवसागराचा पैलतीर गाठता येतो.
म्हणून शब्द हा बंधनही होऊ शकतो आणि मुक्तीचे साधनही.
९. “शब्द” बंधन कधी?
जर आपण शब्दाच्या बाह्य अर्थावरच थांबलो–
माझे मत, माझा अर्थ, माझी कल्पना, माझे ज्ञान
असे झाले तर शब्द अहंकार वाढवतो.
पण–“शब्दाचें अभ्यांतर उकलून दावी”
असे झाले तर शब्द आपल्याला शब्दाच्या पलीकडे घेऊन जातो.
हा वेदान्तातील अत्यंत सूक्ष्म प्रवास आहे.
शब्द → लक्ष्यार्थ → तत्त्व → अनुभव.
१०. म्हणून गणेश आणि शारदा यांची जोड विलक्षण आहे
आता पहिला श्लोक पुन्हा पाहूया–
गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा ।मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ॥
गणेश – बोधाचा आरंभ.
↓
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा ।
शारदा – त्या बोधाला शब्दरूप देणारी आणि शब्दाचे अंतरंग उलगडणारी शक्ती.
↓
गमूं पंथ आनंत या राघवाचा ॥
राम – त्या बोधाचा परमार्थमार्ग/उपास्य ध्येय.
आणि दासबोधातील पुढचा समास काय?
सद्गुरुस्तवन.
समर्थ लगेच म्हणतात–
“आतां सद्गुरु वर्णवेना । जेथें माया स्पर्शों सकेना ।
तें स्वरूप मज अज्ञाना । काये कळे ॥ १॥”
अर्थात–गणेश → शारदा → सद्गुरु हा क्रम योगायोग नाही.



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'पिता-पुत्र'

माझ्या नोकरीत जेव्हा जेव्हा मोहाचे किंवा कसोटीचे प्रसंग येतात, तेव्हा तेव्हा माझे वडील माझ्या डोळ्यांसमोर उभे राहतात. त्यांचे शब्द कानात घुमतात आणि मग कधीही माझे पाऊल वाकडे पडत नाही!" डॉ. नरेंद्र जाधव यांचे 'आमचा बाप आणि आम्ही' हे पुस्तक आपल्यापैकी बहुतेकांनी वाचले असेलच. त्यांचे वडील स्वतः अशिक्षित होते; पण त्यांनी दाखवलेली जिद्द आणि मार्गदर्शनामुळेच डॉ. नरेंद्र जाधव जीवनात एवढे मोठे यश संपादन करू शकले.
आई-मुलीचं नातं जितकं बोलकं, हळवं आणि पारदर्शक असतं; त्याच्या अगदी उलट, वरून शांत, शिस्तप्रिय पण आतून अथांग काळजी आणि जबाबदारीने भारलेलं नातं म्हणजे 'बाप आणि लेक' (वडील-मुलगा)! हे नातं वरवर पाहता अबोल असतं, पण त्याच्या मौनातच संसाराचा संपूर्ण भार पेलण्याची ताकद दडलेली असते.
माझे वडील हे माझ्यासाठी केवळ एक पालक नव्हते, तर ते माझे खरेखुरे मार्गदर्शक आणि संस्कारांचे उगमस्थान होते. आमची आर्थिक परिस्थिती तशी अगदी साधारण होती. पण आपल्या मुलांचे शिक्षण उत्तम व्हावे, त्यांच्या पंखांना बळ मिळावे म्हणून वडिलांनी स्वतःच्या प्रकृतीची तमा न बाळगता दोन दोन नोकऱ्या केल्या; पण आमच्या शिक्षणात कधी खंड पडू दिला नाही.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# मराठी अभिजात भाषा गौरव दिन-वाटचाल आणि सद्यस्थिती

ज्योतिर्मय साहित्य

आजचा दिवस मराठी भाषा आणि मराठीवर प्रेम करणा-यांसाठी सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावा असा ऐतिहासिक क्षण आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर जगभरात, सातासमुद्रापार पोहचूनही तिथे मराठी भाषा, सणवार, उत्सव जोपासणा-यांसाठी एक गौरवाचा अभिमानास्पद दिवस आहे. दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस महाराष्ट्र सरकारने मराठी अभिजात भाषा गौरव दिन अर्थात सन्मान दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारकडून मराठी भाषेला अधिकृतपणे अभिजात भाषा (क्लॉसिकल लँग्वेज) चा दर्जा जाहीर करण्यात आला. मराठी भाषेला अभिजात दर्जा देताना मराठी भाषेची गेल्या सुमारे २५०० वर्षांची परंपरा गृहीत धरण्यात आली. मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, भाषेचे संवर्धन होण्यासाठी, जनमानसामध्ये मराठी भाषेच्या अभिजाततेची ओळख व्हावी, अभिजात मराठी भाषेसंदर्भातील संशोधन, जनजागृती जास्तीत जास्त व्हावी याकरीता प्रतिवर्षी ३ ऑक्टोबरला अभिजात मराठी भाषा दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे मराठी भाषा विभागाने शासन अध्यादेशाद्वारे जारी केले. हा ऐतिहासिक क्षण आणि मराठी भाषेचा गौरव करण्यासाठी हा दिवस निवडण्यात आला आहे. अभिजात भाषा हा वैशिष्ट्यपूर्ण भाषेला भारत सरकारद्वारे दिला जाणारा एक दर्जा आहे. केंद्र सरकारने अभिजात भाषेचे निकष ठरवलेले आहेत. भाषा प्राचीन आणि साहित्य श्रेष्ठ असावे. भाषेचे वय दीड ते अडीच हजार वर्षांचे असावे. भाषेला स्वतः चे स्वयंभूपण असावेत. प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा. हा दर्जा ज्या भाषांना दिला जातो त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून त्या-त्या राज्याला भरीव अनुदान मिळते.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी प्रयत्न सुरू होते. यासाठी महाराष्ट्र राज्य शासन तर्फे रंगनाथ पठारे यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमून ५०० पानांचा अहवाल भारतीय केंद्र सरकारकडे सादर केला होता. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुकीकरीता केंद्र सरकारने राज ठाकरेंच्या पुढाकाराने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. मराठी भाषा मुळातच अभिजात होती. तिला अभिजात दर्जा मिळावा यासाठी महाराष्ट्राने सनदशीर मार्गाने प्रयत्न केले. गेले दशकभर यासाठी अनेक स्तरांवर प्रयत्न करण्यात येत होते. या पार्श्वभूमीवर मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याचा तमाम मराठी भाषिकांना आनंद झाला आहे. तसंच मराठी भाषेच्या विकासासाठी आणखी ऊर्जा, प्रेरणा मिळाली आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने अभिजात भाषेतील स्कॉलर्ससाठी दरवर्षी दोन आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळतात, अभिजात भाषेसाठी सेंटर ऑफ एक्सलंन्स फॉर स्टडिज स्थापन करण्यात येतं, प्रत्येक विद्यापीठात अभिजात भाषेसाठी एक अध्यासन केंद्र स्थापन केलं जातं. प्राचीन ग्रंथाचे डिजिटलाझेशन, भाषांतर, प्रकाशन आणि अर्काईव्हिंग (संग्रहण) क्षेत्रात तरुणांसाठी रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतात.




मराठी' भाषा ही आपली जननी आहे. या भाषेला समृद्ध इतिहास व परंपरा लाभलेली आहे. याच भाषेतून आपण आपल्या भावना, विचार प्रभावीपणे व्यक्त करीत आहोत आणि म्हणूनच काळाच्या ओघात भाषेच्या स्वरूपात कधीही बदल न होणारी, अलौकिक सौंदर्य लाभलेली कुलीन, सुसंस्कृत, उच्च, सभ्य व चिरकाल टिकणारी भाषा म्हणून आपण अभिजात भाषेला म्हणजेच पर्यायाने मराठी भाषेला मनापासून मानतो. आपले राज्य महाराष्ट्र. आपल्या राज्याची मातृभाषा, राजभाषा ही मराठी. भाषेला आपण आपली आई म्हणतो. त्या अर्थाने आपली मराठी भाषा आता ३ ऑक्टोबर २०२४ पासून अभिजात भाषा म्हणून गौरविली गेली आहे. अभिजात भाषा म्हणजे चिरकाल टिकणारी व सौंदर्यप्रधान असलेली सुसंस्कृत भाषा होय. असे म्हटले जाते की, इ.स.पू.२०७ मध्ये ब्राम्ही लिपी आणि मराठी भाषेतील शिलालेख सापडला. इ.स.पू. तीनशे वर्षांपूर्वी मराठी भाषा बोलली जात होती. मराठी भाषेत काळानुरूप बदल होत गेले. आद्यकाल, यादवकाल, बहामनीकाल, छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ, इंग्रजांचा काळ आणि पेशवे काळ या दरम्यान मराठी भाषेत वृद्धी झाली.

सर्वप्रथम सातवाहन राजांनी मराठी भाषेचा वापर व्यवहार, प्रशासनात केल्याचा दाखला मिळतो. त्यानंतर यादवांच्या काळात

**सुनील शिरपुरे**
कमळवेल्ली, यवतमाळ
भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१

मराठी संस्कृती व भाषा भरभराटीस आली. इ.स.११८८ मध्ये आद्यकवी मुकुंदराज यांनी विवेकसिंधू तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी इ.स.११९० मध्ये ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहून मराठी भाषेला राजाश्रय मिळवून दिला. इ.स.१९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्वतंत्ररीत्या निर्मिती होऊन मराठी राजभाषा घोषित करण्यात आले. मुकुंदराज, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, रामदास, श्रीधर, मुक्तेश्वर, मोरोपंत यांच्यासह अनेक कवींना मराठी भाषेचे आद्य कवी मानले जाते. आता ही भाषा जगभरात ७२ देशांमध्ये व भारतातील ३६ राज्यात बोलली जाते. अधिकृत भाषांमध्ये मराठी भाषेला १५ वा क्रमांक मिळाला. सुमारे ११ कोटींहूनही अधिक लोक मराठी भाषा बोलतात. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी मागील अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. पण त्यासाठी केंद्र सरकारचे काही निकष ठरलेले होते. जसे-भाषेचा नोंदवलेला इतिहास हा अती प्राचीन स्वरूपाचा म्हणजे १५०० ते २००० वर्षं जुना हवा, प्राचीन साहित्य हवे, जे त्या भाषिकांना मौल्यवान वारसा वाटते, दुस-या भाषा समूहाकडून उसनी न घेतलेली अस्सल साहित्यिक परंपरा हवी, अभिजात भाषा ही आजच्या भाषेपेक्षा निराळी हवी, असे प्रारूप ठरलेले असल्याने त्यानुसार मराठी भाषा ही अभिजातच आहे, यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून एक अभ्यासपूर्ण अहवाल भारतीय केंद्र सरकारकडे सादर केला होता.

प्रारंभी जेव्हा ही भाषा बोलली गेली, तेव्हा महारट्ठी-महरट्ठी-मऱ्हाटी-मराठी असा मराठीचा उच्चार बदलत गेला, असं या अहवालात म्हटलं आहे. महाराष्ट्रीय भाषा ही महाराष्ट्र हा प्रदेश अस्तित्वात येण्याच्या फार पूर्वीपासून प्रचलित होती आणि मराठीचं वय किमान अडीच हजार वर्षं जुनं असल्याचे पुरावे असल्याचेही या अहवालात म्हटलं आहे. त्यानुसार ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर करून मराठी भाषेला गौरव मिळवून दिला. भारत सरकारने आतापर्यंत तमिळ, संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम, मराठी, बंगाली, पाली, प्राकृत, उडिया आणि आसामी अशा अकरा भाषांना हा अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्यामुळे आता या भाषांसाठी काही संस्था नव्याने उभारल्या जातील. तसेच या भाषांमधल्या प्रकल्पांना पाठबळ देण्यासाठी आर्थिक तरतूदही केली जाईल. मराठी भाषेसाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये भरीव अनुदान स्वरूपात दिले जाईल. त्यामुळे मराठीच्या बोलींचा अभ्यास, संशोधन, साहित्यसंग्रह करणे, भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय करणे, प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे, महाराष्ट्रातील सर्व १२ हजार ग्रंथालयांना सशक्त करणे, मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणा-या संस्था, व्यक्ती, विद्यार्थी अशा सा-यांना भरीव मदत करणे अगदी सुलभ होईल. त्या अर्थाने मराठी भाषेला लाभलेला हा अभिजात भाषेचा अलंकार निश्चितच गौरवणीय असाच आहे. एका बाजूला या सगळ्याचा जरी आनंद असला, तरी इतर भारतीय भाषांच्या तुलनेमध्ये मराठी भाषा ही आपल्या शहरात, राज्यात आजही परकीय आहे, दुय्यम स्थानावर आहे असे व्यवहारात वागत असताना जाणवते. आपल्या शहरात, राज्यात येऊन वर्षानुवर्ष राहणारे बॉलीवूडमधील कलाकार असतील, कॉर्पोरेटमधील अधिकारी असतील, नोकरी करणारे व्यावसायिक असतील, त्यांना आजही मराठी भाषा येत नाही, मराठी भाषा बोलली पाहिजे, असे वाटत नाही. आपल्या मुलांना मराठी सरकारी शाळेत दाखल करणे आणि त्या शाळांचा दर्जा उत्तम राहील, यासाठी प्रयत्न करणे मराठी पालकांना महत्त्वाचे वाटत नाही. मराठी सिनेमा, नाटक, साहित्य याला फार मोठी परंपरा आहे; परंतु ही परंपरा चढत्या क्रमाने पुढे जात राहावी यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. तसे घडताना दिसत नाही किंबहुना हा दर्जा ढासळतो आहे, असेच वाटत आहे. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने केवळ एक दिवस चर्चा करायची आणि एरवी आपली मुले देखील इंग्रजी शाळेत पाठवायची, याला काय म्हणावे? खरे तर आपल्या भाषेतील शब्दांचा वापर आणि जपणूक झाली पाहिजे. तसेच इतर भाषांमधील तंत्रज्ञानाशी संबंधित शब्द हे त्याच्या अर्थासहित समजून घेऊन आपल्या भाषेत त्यासाठी पर्यायी शब्द निर्माण झाले पाहिजेत. यासाठी भाषेवर प्रेम करणा-यांनी जागरूक असायला हवे. तसा कोणताही प्रयत्न मराठी भाषेच्या संवर्धनाच्या बाबतीत होताना दिसत नाही. मराठी भाषा शिकवणा-या प्राध्यापकांच्या मराठी भाषेचे वाचन आणि शिकवणे याविषयी चिंता करावी, अशी परिस्थिती अलीकडे अनेक महाविद्यालयात अनुभवायला मिळते. म्हणून केवळ मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला याचा आनंद व्यक्त करणे पुरेसे नाही. आपण सर्वच मराठी माणसांनी जाणीवपूर्वक आपली भाषा ही इतर भाषिकांनी शिकावी त्यातले ज्ञान, परंपरा, त्यातील शब्द सौंदर्य आणि शब्द संपदा आणि श्रीमंती इतरांनाही आपल्याला अनुभवायला देता यावी.

# महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती एमआयटीमध्ये उत्साहात साजरी





ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - एमआयटी समूह संस्थांच्या वतीने महात्मा गांधी जयंती व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंती आनंद हॉल येथे उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे प्रा. रवी कोर्डे (शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर), महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. निलेश पाटील, एमआयटी पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. सुनील देशमुख व एमआयटी कॉलेज ऑफ इमर्जिंग सायन्सचे प्राचार्य डॉ. भालचंद्र वायकर यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रा. रवी कोर्डे यांनी महात्मा गांधी यांच्या विचारांचे समकालीन महत्त्व स्पष्ट केले. 'ग्रामस्वराज्य' ही गांधीजींच्या मूल्यव्यवस्थेची मूलभूत संकल्पना असून राष्ट्राच्या समृद्धीसाठी गावांचे सक्षमीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले. गांधीजींनी अंगीकारलेल्या नैतिकतेचे पालन प्रत्येक नागरिकाने करणे आवश्यक असून 'सत्य हेच ईश्वर' आणि 'अहिंसा परमो धर्मः' या विचारांना जीवनात स्थान देण्याचे आवाहन त्यांनी केले.

आजच्या काळात व्यक्तीने स्वतःचे वास्तविक स्वरूप ओळखून आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. केवळ आपली प्रतिमा किंवा सामाजिक प्रतिष्ठा दाखविण्यासाठी 'इमेज बिल्डिंग' करण्यापेक्षा मूल्याधिष्ठित जीवन जगणे महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी नमूद केले. गांधीजींचा तंत्रज्ञानाला विरोध नव्हता; मात्र मानवकल्याणासाठी उपयुक्त ठरणारे आणि रोजगाराच्या संधी हिरावून न घेणारे तंत्रज्ञान विकसित व्हावे, हा त्यांचा दृष्टिकोन होता.

आजच्या युगात भाषा व भावनांचे होत असलेले सामान्यीकरण व्यक्तीच्या सर्जनशीलतेला मर्यादा आणत आहे. प्रत्येक व्यक्तीने आपली स्वतंत्र विचारशक्ती आणि सर्जनशीलता जपणे आवश्यक आहे. गांधीजींनी आपल्या 'स्व'चा त्याग करून समाज आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च स्थान दिले; मात्र आज समाज गांधीजींच्या विचारांपासून दूर जात असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नीलिमा पाथ्रीकर यांनी केले, तर डॉ. एस. जी. कादरी (डीन, विद्यार्थी कल्याण) यांनी आभार मानले. कार्यक्रमास एमआयटी समूह संस्थांमधील सर्व शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुनिता गोविंद कपाळे यांना संत ज्ञानेश्वर महाराज जन्मसंस्थान यांच्यावतीने ज्ञानरत्न पुरस्कार जाहीर

ज्योतिर्मय साहित्य



पैठण - संत ज्ञानेश्वर महाराज जन्मसंस्थान श्री श्रेत्र आपेगाव यांच्यावतीने दरवर्षी संत ज्ञानोबाराया साहित्य संमेलन आयोजित करण्यात येते. यावेळी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञान, साहित्य आणि मानवतावादी विचारांची परंपरा पुढे नेणाऱ्या साहित्यिकांचा सन्मान करण्यात येतो. दिनांक २४ नोव्हेंबर २०२६ रोजी जेष्ठ साहित्यिका, कवयित्री लेखिका, मार्गदर्शक, संपादक सौ सुनिता गोविंद कपाळे यांचा ज्ञानरत्न पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. कवितेतून सामाजिक प्रबोधन करणे, नवरात्र महोत्सव, गणपती महोत्सव, शालेय उपक्रमात प्रबोधनात्मक कविता सादर करुन सामाजिक देण्याचे काम त्या करतात. त्याच बरोबर रक्तदान शिबीरे, वृक्षारोपण, अनाथाश्रम, वृद्धाश्रमात मदत करणे हे त्यांचे कार्य मागील पंचवीस वर्षांपासून सातत्याने चालू आहे. आत्तापर्यंत त्यांना महाराष्ट्रातील शासकीय निमशासकीय अशा संस्थेकडुन ५२ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. सामाजिक संदेश देणाऱ्या संतांच्या भुमीत त्यांचा ज्ञानरत्न पुरस्कार देऊन सन्मान होणार आहे. ही अभिमानास्पद बाब आहे. त्यांच्या साहित्यिक सामाजिक शैक्षणिक प्रेरणादायी कार्यासाठी अभिनंदन आणि शुभेच्छा.

# पितृपक्षातील षड्रसयुक्त बहुगुणी चटणी

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या भारतीय संस्कृतीत देव, ऋषी, यांच्या सोबतच आपल्या वाडवडिलांना, पितरांनासुद्धा त्यांचे महत्व ओळखून तितकाच सन्मान दिला जातो. त्यांना संतुष्ट ठेवले तर त्यांच्या आशीर्वादाने आपले कल्याण होते अशी श्रद्धा आहे. म्हणूनच वर्षभरातील हे गणपतीनंतरचे भाद्रपद महिन्यातील पंधरा दिवस खास पितरांच्यासाठी समर्पित केला आहे. त्यात त्यांच्या आवडीचे आणि त्यांना स्ट्राँग करण्यासाठी जास्तीतजास्त पौष्टिक पदार्थ,सात्विक अन्न, सारे रस असलेले पदार्थ जेवायला देऊन,पाणी पाजून त्यांना तृप्त केले जाते. म्हणून खास अळूची भाजी, डाळीचे वडे, खीर,कढी, पंचामृत आणि खास आमसूलाचीच चटणी बनवली जाते. ही एरवी जास्त बनवली जात नसली तरी खूपच टेस्टी, आणि पाचक, बहुगुणी असते. आज आपण त्यात सुद्धा अजून काही बदल करून अजून टेस्टी आणि जास्त पाचक,बहुगुणी बनवली तर सर्वांना तर आवडेलच पण पितर सुद्धा ही खाऊन तृप्त होऊन भरभरून आशीर्वाद देतील हे नक्की! मग पहायची आहे ना?..

साहित्य :

८-१० आमसुले, १ मोठा आवळा, अर्धी वाटी खोवलेला नारळ, ८-१० खजूर, अर्धा चमचा ओवा,आवडीनुसार लाल तिखट , सैंधव, हिंगपूड,५-६ कढिपत्त्याची पाने, अर्धा चमचा जिरे , २ चमचे तेल, किंचित आले, मोहरी, ८..१० मेथीदाणे , एक लाल मिरची.




कृती :

बिया काढून खजूर व आमसुले कोमट पाण्यात भिजत ठेवावेत. भिजून मऊ झाले की पाण्यातून काढून त्यामध्ये आवळ्यातील बी काढून त्याच्या फोडी ,नारळ,ओवा,आले,थोडे जिरे,व चवीप्रमाणे सैंधव व लाल तिखट घालून मिक्सर मधून बारीक वाटून घ्यावे. काचेच्या बाऊल मधे काढून घ्यावी. तेलात मोहरी, मेथ्या, जिरे, हिंग, कढीपत्ता एक लाल मिरची यांची खमंग फोडणी करून चटणीवर घालावी.

वैशिष्ट्य :

कोकणात कोकम म्हणजेच आमसुले, आणि नारळ ताजे, सुंदर मिळतात. त्यामुळे इथे ही चटणी तर खूपच टेस्टी होते. एरव्ही सारख्या खोबरे,शेंगदाणे, नारळ,कारळ,जवस या चटण्या सगळेच बनवतात. किंवा ओली चटणी म्हटली की चिंच गुळाची किंवा टोमॅटोची बनवली जाते. पण ही आमसूलाची अशा प्रकारे चटणी बनवली तर सगळेजण नक्कीच आवडीने खातील. ही बाराही महिने बनवता येते, फ्रीझमध्ये ठेवली तर भरपूर दिवस मस्त राहते.

आंबट, गोड, खारट, तुरट, तिखट, कडवट असे षड्रस, सहा चवी एकत्र जमल्याने ही चटणी खूपच चवदार लागते. शरीरासाठी आवश्यक असे हे सहा रस अत्यंत आरोग्यवर्धक आहेत.

**सौ.स्नेहा मुसरीफ,**
पुणे

आवळा, आमसुले, आले यानी ही चटणी पाचक आणि पित्तनाशक तर मेथ्या,हिंग, कढिपत्ता कृमीनाशक आहेत.गुळ किंवा साखर न वापरता खजूर वापरल्यामुळे गुणकारी आहे. अशी ही बहुगुणी चटणी जेवणात किंवा स्टार्टर बरोबर किंवा वडे, ढोकळा, कोथिंबीर वड्या यांसारख्या पदार्थांबरोबर खाता येते.

श्राद्धाच्या वेळी किंवा पितृ पंधरवड्यात आमसुलाची चटणी आमसुले, जिरे, आले, गुळ, मिठ घालून वाटून बनवतात. पण ती अशी सर्वांनाच आवडते असे नाही. मग त्या ऐवजी थोडा बदल करून अशी बनवली तर सर्वांनाच आवडेल.आता या दिवसांत सुद्धा आवळे मिळतात. यावेळी अशी चटणी नक्की करून पहा.

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# पितृपंधरवडा : श्रद्धा, स्मृती आणि विज्ञानाचा सुंदर सेतू

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

मृत व्यक्तीचे शरीर भौतिक स्वरूपात अस्तित्वात नसते. त्यामुळे श्राद्धातील अन्न मृत व्यक्तीच्या शरीराला प्रत्यक्ष पोहोचते, असा दावा वैज्ञानिक पद्धतीने सिद्ध झालेला नाही.

पण मग श्राद्धाचा अर्थ संपतो का?

नाही. उलट त्याचा मानवी अर्थ अधिक सुंदर होतो.

श्राद्धात तयार केलेले अन्न, ब्राह्मणभोजन, अन्नदान, गरजूंना मदत, प्राण्यांना अन्न देणेया कृतींमधून मृत व्यक्तीच्या स्मृतीला सामाजिक कृतीचे रूप मिळते.

''माझ्या आईला गोड पदार्थ आवडत होता, म्हणून आज तिच्या स्मरणार्थ मी एखाद्याला अन्न देतो.''

ही कृती मृत व्यक्तीला अन्न पोहोचवत नसली, तरी जिवंत माणसाच्या मनात कृतज्ञता निर्माण करते आणि दुसऱ्याच्या पोटात अन्न पोहोचवते.

हीच परंपरेची आधुनिक पुनर्व्याख्या होऊ शकते.

कावळ्याला अन्न का?

पितृपक्ष म्हटले की कावळ्याची आठवण अपरिहार्य.

अनेक भारतीय परंपरांमध्ये कावळ्याला पितरांचा प्रतीकात्मक प्रतिनिधी मानले गेले आहे. कावळ्याला अन्न देऊन पूर्वजांना अन्न अर्पण केल्याची भावना व्यक्त केली जाते.

यामागे धार्मिक प्रतीक आहे; परंतु त्याला थेट वैज्ञानिक तथ्य म्हणून मांडणे योग्य नाही.

कावळा हा बुद्धिमान, सर्वभक्षी आणि मानवी वस्तीशी सहज जुळवून घेणारा पक्षी आहे. त्यामुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात त्याचे स्थान प्राचीन काळापासून होते. मृत्यू, अन्न, निसर्ग आणि पक्षी यांना जोडणारे प्रतीक म्हणून कावळा भारतीय लोकसंस्कृतीत रूजला असावा, असे सांस्कृतिक दृष्टिकोनातून पाहता येते.

याचप्रमाणे ''कावळ्याच्या विष्ठेमुळे पिंपळाची झाडे निर्माण होतात'' ही लोकमान्यता काही प्रमाणात नैसर्गिक बीजप्रसाराच्या निरीक्षणाशी जोडली जाऊ शकते. पक्षी फळे खातात आणि त्यांच्या विष्ठेद्वारे बिया वेगवेगळ्या ठिकाणी पोहोचतात; त्यामुळे पक्ष्यांमार्फत बीजप्रसार होतो. मात्र, विशेषतः कावळ्यामुळेच पिंपळाची झाडे निर्माण होतात, असा वैज्ञानिक नियम नाही.

लोकपरंपरेत निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण अनेकदा प्रतीकांच्या रूपाने जतन झालेले दिसते.

पितृपक्ष म्हणजे दुःखाचे मानसशास्त्रही

एखादी व्यक्ती आपल्यातून निघून जाते; पण तिची आठवण संपत नाही.

माणसाच्या मनाला मृत्यू स्वीकारणे सोपे नसते. मानसशास्त्रीय संशोधनानुसार स्मरण, सामूहिक विधी आणि सांस्कृतिक परंपरा शोकाचा सामना करण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. अमेरिकन मध्ये प्रकाशित संशोधनाच्या आढाव्यानुसार कौटुंबिक विधी कुटुंबाला स्थैर्य देऊ शकतात आणि पिढ्यांमधील सातत्याची भावना निर्माण करतात.

पूर्वजांचे स्मरण हे केवळ भूतकाळात अडकून राहणे नाही.

कधी कधी ते मनाला सांगते

''हो, ते आज आपल्यात नाहीत; पण त्यांनी दिलेले प्रेम, संस्कार आणि आठवणी आजही आपल्या जीवनात आहेत.''

पितृपक्ष हा एका अर्थाने सामूहिक स्मृतीचा उत्सव आहे.

ही परंपरा केवळ भारतातच आहे का?

अजिबात नाही!

मानवजातीच्या इतिहासात पूर्वजांचे स्मरण आणि मृत व्यक्तींना आदर देण्याची परंपरा अनेक संस्कृतींमध्ये आढळते.




जपानमध्ये ओबोन या परंपरेत पूर्वजांचे स्मरण केले जाते. कुटुंबे एकत्र येतात, स्मृतिस्थळांना भेट देतात आणि पूर्वजांच्या आठवणींना धार्मिक-सांस्कृतिक रूप देतात.

चीनमध्ये किंवा - मध्ये कुटुंबीय पूर्वजांच्या समाधींना भेट देतात, त्यांची स्वच्छता करतात आणि स्मरण करतात.

मेक्सिकोमध्ये या प्रसिद्ध परंपरेत दिवंगत कुटुंबीयांच्या स्मृतींना रंगीबेरंगी आणि कौटुंबिक स्वरूप दिले जाते.

ख्रिश्चन परंपरेत ' हा मृत व्यक्तींच्या स्मरणाशी संबंधित दिवस आहे.

आफ्रिका आणि आशियातील अनेक समाजांमध्येही पूर्वजांविषयी आदर, प्रार्थना आणि स्मरणाच्या विविध परंपरा आहेत. च्या मानसशास्त्रीय शब्दकोशातही ही प्रथा आशिया आणि आफ्रिकेतील विविध संस्कृतींमध्ये आढळते असे नमूद केले आहे.

म्हणजेच

मृत्यू सर्व मानवांचा समान अनुभव आहे; म्हणून मृतांच्या स्मरणाची गरजही जगभर समान दिसते.

पद्धती बदलतात; भावना बदलत नाही.

श्राद्ध म्हणजे पूर्वजांची पूजा की स्वतःच्या मुळांचा शोध?

आजच्या पिढीने हा प्रश्न नव्याने विचारण्याची गरज आहे.

आपल्या मुलांना आजोबांचे नाव माहीतआहे का?

पणजोबा काय काम करायचे, त्यांचे गाव कोणते होते, त्यांनी कुटुंबासाठी काय केले, त्यांना कोणते संस्कार प्रिय होतेहे आपल्याला माहीत आहे का?

पितृपक्ष हा या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची संधी ठरू शकतो.

श्राद्धाच्या दिवशी केवळ पुरोहित बोलावण्याऐवजी घरातील ज्येष्ठांनी मुलांना सांगावे

''ही तुझी पणजी. तिने अत्यंत कठीण परिस्थितीत मुलांना शिकवले.''

''हे तुझे पणजोबा. त्यांनी शून्यातून व्यवसाय उभा केला.''

''ही तुझी आजी. तिने घरातील सर्वांना एकत्र ठेवले.''

अशा कथा सांगितल्या की वंशावळ कागदावर राहत नाही; ती मुलांच्या मनात जिवंत होते.

मानसशास्त्रात म्हणजे समूहाच्या सामायिक स्मृतीची संकल्पना आहे. स्मारके, कथा, प्रतीक आणि स्मरणविधी यांच्या माध्यमातून समूहाची ओळख आणि पिढ्यांमधील नाते टिकून राहते.

मग अंधश्रद्धा कोणती आणि श्रद्धा कोणती?

एखाद्या परंपरेचे मूल्यांकन करताना विवेक आवश्यक.

''पूर्वजांचे स्मरण करणे, त्यांच्या नावाने अन्नदान करणे, कुटुंब एकत्र आणणे, त्यांच्या चांगल्या गुणांची आठवण ठेवणे''यात श्रद्धा, संस्कृती आणि मानवी मानसशास्त्र यांचा सुंदर संगम आहे.

पण,

''विशिष्ट विधी केला नाही तर पूर्वज शाप देतील'', ''अमुक व्यक्ती नक्कीच आजारी पडेल'', ''अमुक वस्तू दिल्याशिवाय आत्म्याला अन्न मिळणार नाही'' अशा भीतीवर आधारित दावे वैज्ञानिक पुराव्याशिवाय स्वीकारणे योग्य नाही.

श्रद्धा जर कृतज्ञतेकडे घेऊन जाते, तर ती मन समृद्ध करते.

श्रद्धा जर भीती, अपराधगंड आणि आर्थिक शोषणाकडे घेऊन जात असेल तर ती अंधश्रद्धा होईल. इथे विवेकाची गरज निर्माण होते.

म्हणूनच भारतीय परंपरेतील सुंदर वाक्य आठवते

''श्रद्धा असावी; पण श्रद्धेला विवेकाची साथ असावी.''

आजच्या काळात पितृपक्ष कसा साजरा करावा?

आज पितृपक्षाला नवा अर्थ देता येईल.

पूर्वजांच्या तिथीला

त्यांच्या छायाचित्रासमोर दीप लावावा.

त्यांच्या आठवणी मुलांना सांगाव्यात.

त्यांच्या नावाने अन्नदान करावे.

एखाद्या गरजू विद्यार्थ्याला शैक्षणिक मदत करावी.

झाड लावावे.

पक्षी-प्राण्यांना पाणी व अन्न द्यावे.

कुटुंबातील ज्येष्ठांचा सन्मान करावा.

पूर्वजांनी दिलेल्या चांगल्या मूल्यांपैकी एखादे मूल्य पुढे नेण्याचा संकल्प करावा.

समजा, आजोबा झाडे लावत असत. त्यांच्या स्मरणार्थ एक झाड लावले.

आजोबांच्या शरीराला ते झाड अन्न देणार नाही.

पण त्यांची झाडे लावा झाडे जगवा हे जीवनमूल्ये पुढील पिढीमध्ये रुजेल . ती पिढी तो वारसा पुढे नेईल.




हीच आधुनिक काळातील पितृभक्तीची सुंदर व्याख्या होऊ शकते.

पितृपंधरवडा हा भूतकाळापासून भविष्याकडे नेणार आहे

पितृपक्ष हा मृत्यूचा उत्सव नाही; तो स्मृतीचा संवाद आहे.

तो आपल्याला सांगत

तुम्ही ज्या घरात राहता, त्याच्या भिंतींमध्ये कोणाचातरी घाम आहे.

तुम्ही जे शिक्षण घेतले, त्यामागे कोणीतरी त्याग केला आहे.

तुम्ही ज्या संस्कारांची भाषा बोलता, ती कोणीतरी आधीच्या पिढीने जपली आहे.

तुमच्या रक्तात, नावात, संस्कारात आणि आठवणीत अनेक पिढ्या जगत आहेत.

म्हणून पितृपंधरवडा म्हणजे केवळ तिथीला पिंड ठेवण्याचा विधी नाही.

तो आहे

कृतज्ञतेचा दिवस.

स्मृतींचा दिवस.

कुटुंबाला एकत्र आणण्याचा दिवस.

आपल्या मुळांकडे पाहण्याचा दिवस.

आणि पुढच्या पिढीला आपली कथा सांगण्याचा दिवस.

विज्ञान आपल्याला सांगते की मृत व्यक्तीला अन्न प्रत्यक्ष पोहोचते याचा पुरावा नाही. मानसशास्त्र आपल्याला सांगते की स्मरणविधी, कौटुंबिक परंपरा आणि शोक व्यक्त करण्याच्या पद्धती माणसाला भावनिक आधार देऊ शकतात. धर्म आपल्याला कृतज्ञतेची भाषा देतो. संस्कृती आपल्याला त्या कृतज्ञतेचे विधी देते.

म्हणून पितृपक्षाकडे पाहताना कदाचित सर्वात सुंदर समन्वय असा

श्रद्धा मनात असावी,

विज्ञान विचारात असावे,

विवेक निर्णयात असावा

आणि कृतज्ञता कृतीतअसावी.

पितरांना आपण काय देऊ शकतो?

आपण

त्यांच्या हातात अन्न ठेवू शकत नाही.

आपण

त्यांच्या कानात पुन्हा आवाज पोहोचवू शकत नाही.

त्यांच्या डोळ्यांसमोर पुन्हा उभे राहू शकत नाही.

पण त्यांच्या स्मृतींना आपण जिवंत ठेवू शकतो.

त्यांच्या चांगल्या गुणांचे अनुकरण करू शकतो.

त्यांच्या नावाने एखाद्याच्या आयुष्यात प्रकाश आणू शकतो.

आणि पुढच्या पिढीला सांगू शकतो ''तू जिथे उभा आहेस, तिथे तुझ्यापूर्वी अनेकांनी वाट चालून ठेवली आहे.'' कदाचित हाच पितृपंधरवड्याचा सर्वात मोठा संदेश आहे ''मुळांना विसरू नका; कारण मुळांची आठवण असली तरच वृक्षाला आपल्या उंचीचा अर्थ समजतो.''

## उन्नती सोशल फाउंडेशनतर्फे ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्वच्छतेचा जो संदेश दिलेला आहे तो दैनंदिन जीवनात आपण आचरणात आणून आपला परिसर कसा स्वच्छ राहिल याबाबत सदैव प्रयत्नशील रहावे तसेच ज्येष्ठांनी आपल्या वाढदिवसानिमित्त एक तरी झाड लावून पर्यावरण संवर्धनाला हातभार लावावा असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका विधी समिती सदस्या तथा नगरसेविका तसेच उन्नती सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. कुंदा भिसे यांनी केले.

भारतीय जनता पक्षाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत महात्मा गांधी, माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती आणि ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त पिंपळे सौदागर परिसरातील जवळपास शंभर ज्येष्ठ नागरिकांचा येथील उन्नती सोशल फाउंडेशन आणि प्रभागातील भाजपाच्या नगरसेविका डॉ. कुंदा भिसे यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. शुक्रवार दि. २ रोजी उन्नती सोशल फाउंडेशनच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमास भाजपचे कार्यकर्ते



संदेश काटे, राज्य परिवहन विभागाचे उपाध्यक्ष वाल्मिक काटे , उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे, तसेच निवृत्त डीसीपी अनिल बागलकोट, ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे सचिव सखाराम ढाकणे, लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष अशोक वारकर, आनंद हास्य योगा क्लबचे अध्यक्ष दिगंबर राजगुरे तसेच आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी परिसरातील ज्येष्ठ नागरिकांचा शाल आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात झालेल्या या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन बाळकृष्ण चौधरी यांनी केले.




## नवसंजीवनी वाचनालयात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती तसेच सत्कार समारंभ

**ज्योतिर्मय साहित्य**

कुरखेडा - दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा शासन मान्यता असलेल्या नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालय देऊळगाव येथे, भारत देशाचे राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करून माल्यार्पण करण्यात आले व त्यांची जयंती साजरी करण्यात आली. वाचन संस्कृतीचे महत्व जाणून देऊळगाव येतील भास्कर खुणे न चुकता दररोज वाचनालयात येऊन वृतपत्र वाचत असतात. आणि आजच्या पिढीला वाचनाचे महत्व व फायदे पटवून देतात त्यांचे हे, अनमोल विचार, कार्य व वाचनाप्रती असलेली आवड बघून नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष संतोष ठलाल यांनी पुष्पगुच्छ, शाल,श्रीफळ देऊन त्यांचा वाचनालयाच्या वतीने सत्कार केला. सोबतच साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता ठलाल यांनी सुद्धा दोन्ही महापुरुषांच्या जीवनावर प्रकाश टाकला. त्यावेळी उपस्थित असलेले देऊळगाव येतील प्रतिष्ठित



नागरिक मंगेश गावळे, श्रावण ठलाल, पुर्णाबाई ठलाल, राजू ठलाल सत्कारमूर्ती भास्कर खुणे, विद्या,विकास हायस्कूल आणि जि.प.प्रा.शाळा देऊळगाव येतील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी दोन्ही महापुरुषांना अभिवादन केले.

## कुटुंबप्रमुख हवा आहे! भाग ३ : माधवांचा पहिला प्रश्न

**ज्योतिर्मय साहित्य**

''तुम्हाला माहीत आहे का, तुम्ही कोण आहात?''

माधव मामांचा प्रश्न ऐकून श्रीराम आणि श्रुतकीर्ती एकमेकांकडे पाहू लागले. ''मी श्रीराम आहे,'' श्रीरामने सहज उत्तर दिले. ''आणि मी श्रुतकीर्ती!'' पाच वर्षांची श्रुतकीर्ती हसत म्हणाली. माधव मामा हसले. ''नावे तर तुम्हाला माहीत आहेत. पण मी ते तर विचारलं नव्हतं.'' दोघेही गप्प झाले. कृष्णकांत आणि पामेला दूर उभे राहून हे सगळं पाहत होते.

माधव मामांनी मुलांच्या जवळ बसत विचारलं, ''तुम्ही कुठून आलात?'' ''लॉस एंजेलिसमधून!'' श्रीरामने तत्परतेने उत्तर दिले. मामा पुन्हा हसले. ''तुम्ही कुठे राहता, हे तर मी विचारलं नाही. तुमची मुळं कुठले आहेत, हे विचारलं.'' श्रीरामच्या चेहऱ्यावर आता कुतूहल दिसू लागले. ''माझे बाबा भारतातून आले आहेत. आईचे आई-बाबाही भारतातून आले आहेत,'' तो म्हणाला. ''म्हणजे?'' ''म्हणजे... आम्ही इंडियन आहोत.'' माधव मामांनी त्याच्या डोक्यावरून हात फिरवला. ''हो. पण 'इंडियन' हा फक्त पासपोर्टवर लिहिलेला शब्द नाही.''

पामेला नकळत पुढे आली. माधव पुढे म्हणाले, ''तुमची भाषा, तुमची माणसं, तुमच्या घरातील मोठ्यांचा आदर, अन्नाबद्दलची कृतज्ञता, निसर्गाबद्दलचा आदर, सत्य बोलण्याची सवय, दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव, हे सगळं मिळून तुमची ओळख घडते.'' श्रुतकीर्ती शांतपणे ऐकत होती.




''मामा आजोबा'' ती अचानक म्हणाली, ''हे सगळं आम्हाला शिकवणार का?'' माधव मामांनी तिच्याकडे पाहिलं. ''शिकवणार नाही. आधी तुमच्याबरोबर जगणार.'' कृष्णकांतच्या डोळ्यांत समाधान उमटलं. त्याला आता उमगलं होतं, त्यांनी अमेरिकेत 'कुटुंबप्रमुख' शोधला नव्हता. त्यांना आपल्या मुलांसाठी कुटुंबच सापडलं होतं. पण माधव मामांच्या मनात अजून एक मोठा प्रश्न होता, आणि तो प्रश्न त्यांनी दुसऱ्याच दिवशी सकाळी श्रीरामला विचारला, ''श्रीराम, तुला तुझ्या आजोबांची गोष्ट माहीत आहे का?''

श्रीरामने मान हलवली. ''नाही.''

''मग आजपासून सुरुवात करूया.''

क्रमशः भाग ४ : आजोबांची गोष्ट

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559